सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १५ सप्टेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १६२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## आचार्य देवव्रत यांचे मुंबईत आगमन, सोमवारी घेणार राज्यपालपदाची शपथ

मुंबई : महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे पत्नी दर्शना देवी यांच्यासह रविवारी मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक येथे आगमन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. नंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही देवव्रत यांचे स्वागत केले. कौशल्य विकास मंत्री आणि मुंबई शहर जिल्हा पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार, राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त मुख्य सचिव आणि मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा म्हैसकर, रेल्वे पोलीस महासंचालक प्रशांत बुरुडे, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, मुंबई शहर जिल्हाधिकारी आँचल गोयल तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी याप्रसंगी उपस्थित होते. मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक येथे रेल्वे पोलीस विभागाच्यावतीने महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांना मानवंदना देण्यात आली. नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत हे सोमवार १५ सप्टेंबर २०२५ रोजी



सकाळी ११ वाजता शपथ घेतील आणि पदभार स्वीकारतील. राजभवन येथे दरबार हॉलमध्ये शपथविधी होणार आहे.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी एनडीएचे उमेदवार म्हणून उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक लढवण्यासाठी राजीनामा दिल्यापासून महाराष्ट्राचे राज्यपालपद रिक्त आहे. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे पुढील निर्णय होईपर्यंत महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

आचार्य देवव्रत हे एक अनुभवी शिक्षणतज्ज्ञ आणि राजकारणी आहेत, जे सध्या गुजरातचे राज्यपाल म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या राजकीय आणि प्रशासकीय कारकिर्दीची सुरुवात हिमाचल प्रदेशच्या राज्यपालपदापासून झाली होती. आचार्य देवव्रत हिमाचल प्रदेशचे जवळपास चार वर्ष राज्यपाल राहिले, २०१५ पासून २०१९ पर्यंत त्यांनी त्या पदावर कामगिरी केली. त्यांच्या कार्यकाळात राज्यातील प्रशासनिक सुधारणांपासून शिक्षण क्षेत्रातील उपक्रमांपर्यंत विविध पद्धतींचा अभूतपूर्व अनुभव मिळाला. हिमाचल प्रदेशमधील कार्यकाळानंतर, त्यांना राज्यपाल म्हणून गुजरातची जबाबदारी देण्यात आली. आता त्यांच्या अनुभवाचा पुढचा टप्पा महाराष्ट्रासाठी आहे, कारण महाराष्ट्राचे राज्यपालपद त्यांच्याकडे अतिरिक्त जबाबदारीसह सोपवण्यात आले आहे. आचार्य देवव्रत यांच्या कार्यकाळात प्रशासनातील पारदर्शकता, शिक्षण क्षेत्रातील सुधारणा आणि राजकीय संतुलन राखण्याची क्षमता लक्षवेधी ठरली आहे, त्यामुळे महाराष्ट्रातही त्यांच्या नेतृत्वाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गुजरातचे राज्यपाल म्हणून काम करण्यापूर्वी, देवव्रत यांनी ऑगस्ट २०१५ ते जुलै २०१९ पर्यंत हिमाचल प्रदेशचे राज्यपालपद भूषवले होते. त्यांनी जुलै २०१९ पासून गुजरातचे राज्यपाल म्हणून काम सुरू केले. लवकरच ते गुजरात आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांचे राज्यपाल म्हणून कार्यभार हाताळणार आहेत. आचार्य देवव्रत यांनी इतिहास आणि हिंदीमध्ये पदव्युत्तर पदवी घेतली आहे. योग विज्ञानात डिप्लोमा केला आहे. निसर्गोपचार आणि योगिक विज्ञानात ते डॉक्टर आहेत. वैदिक मानवी मूल्ये आणि वैदिक तत्वज्ञानावर त्यांनी व्याख्याने दिली आहेत. नैसर्गिक शेती आणि गोवंश सुधारणेबद्दल जागरूकता पसरविण्यासाठी त्यांनी भरपूर काम केले आहे.

## अचानक येऊन पाहणी करा, पुणेकर महिलेची अजित पवारांकडे मागणी

पुणे : वाहनांची वाढती संख्या विचारात घेता रस्ते रुंद करण्यावर शासनाचा भर आहे, वाढत्या वाहनामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ती सोडवा, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले. खराडी ते केशवनगर पुलाच्या कामांसह मुंढवा चौक आणि हडपसर गाडीतळ येथे वाहतूक कोंडी सोडवण्याकरिता स्थळ पाहणी करत अजित पवारांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.



खराडी ते केशवनगर पुलाचे काम करतांना अत्याधुनिक, दर्जेदार साहित्य वापरावे. या पुलामुळे चंदननगर, केशव नगर, खराडी परिसरातील नागरिकांना वाहतूक कोंडीपासून सुटका मिळणार असल्याने कामे गतीने पूर्ण करा; असे निर्देश अजित पवारांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. याप्रसंगी नागरिकांनी अजित पवारांची भेट घेतली. पाणी, रस्ते, पथदिवे, कायदा व सुव्यवस्था, बससेवा आदींबाबत विविध मागण्या केल्या. या मागण्या ऐकून घेतल्यानंतर अजित पवारांनी त्या प्राधान्याने मार्गी लावण्यात येतील, अशी ग्वाही नागरिकांना दिली. याप्रसंगी एका पुणेकर महिलेने अजित पवारांना एक विशेष विनंती केली. अचानक येऊन पाहणी करा म्हणजे इथल्या समस्या व्यवस्थित समजतील, असे महिला अजित पवारांना म्हणाली. नागरिकांच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी योग्य ते प्रयत्न करू असे आश्वासन अजित पवारांनी दिले.

मुंढवा चौक आणि हडपसर गाडीतळ येथील वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता आवश्यक ते सर्व पर्याय विचारात घेऊन पुणे महानगर पालिका, पोलीस प्रशासन, पीएमपीएल, लोकप्रतिनिधींनी मिळून बैठक आयोजित करुन योग्य ती कार्यवाही करावी, अशी सूचना अजित पवारांनी केली.

## मुंबई विमानतळावर बनावट भारतीय पासपोर्टवर फिरताना आढळले नेपाळी आणि बांगलादेशी नागरिक

मुंबई: मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर अलीकडेच दोन परदेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. बनावट भारतीय पासपोर्टच्या आरोपाखाली या दोघांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक केलेल्या आरोपींपैकी एक बांगलादेशी, कृष्णा मार्पन तमांग (वय २९) तर दुसरा ६७ वर्षीय निरंजन नाथ सुबल हा बांगलादेशचा रहिवासी आहे.

या दोघांनी कोलकातामध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय पासपोर्ट मिळवले होते. त्यांनी या पासपोर्टचा वापर करून वेगवेगळ्या देशांमध्ये प्रवासदेखील केला होता. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, निरंजन नाथ शुक्रवारी मस्कत (ओमानची राजधानी) येथून मुंबईत परतला. त्याची कागदपत्रे चुकीची असल्याचे आढळल्यानंतर त्याची चौकशी करण्यात आली तेव्हा त्याने पासपोर्ट फसवणूक केल्याची कबुली दिली.

वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, त्याच वेळी कृष्णा मार्पन तमांग विमानतळावरून परदेशात जाण्याच्या तयारीत होता आणि चेक-इन दरम्यान त्याला पकडण्यात आले. दोघांनाही सहार पोलिस ठाण्यात नेण्यात आले आणि चौकशी करण्यात आली. पोलिसांनी सांगितले की, भारतीय न्याय संहितेच्या फसवणूक आणि बनावटीशी संबंधित कलमांव्यतिरिक्त, दोघांविरुद्ध पासपोर्ट कायद्याअंतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बनावट पासपोर्टवर दोन्ही आरोपींचा अनेक देशांमध्ये प्रवास

बनावट पासपोर्टच्या मदतीने या दोन्ही आरोपींनी अनेक देशांमध्ये प्रवास केल्याचेही तपासात उघड झाले आहे. कोलकातामध्ये त्यांच्यासाठी पासपोर्ट कोणी तयार केले आणि या टोळीत आणखी लोक सामील आहेत का, याचा पोलिस आता कृष्णा मार्पन तमांग आहेत. सहार पोलिसांचे पथक या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहे. या अटकेमुळे विमानतळांच्या सुरक्षा व्यवस्थेबद्दल आणि पासपोर्ट पडताळणी प्रक्रियेबद्दल अनेक प्रश्न उपस्थित होतात. या प्रकरणात आणखी काही खुलासे होऊ शकतात असे पोलिसांचे म्हणणे आहे.

## आसाममध्ये ५.८ तीव्रतेचा भूकंप; नागरिकांत भीती

दिसपूर : आसाममधील गुवाहाटी येथे आज, रविवारी (१४ सप्टेंबर) भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले आहेत. संध्याकाळी ४:४१ वाजता गुवाहाटीमध्ये भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता ५.८ रिश्टर स्केलवर नोंदवली गेली आहे. आसाम व्यतिरिक्त, या भूकंपाचे धक्के भुटान आणि पश्चिम बंगालच्या उत्तरेकडील भागांमध्ये देखील जाणवले. भूकंपामुळे लोकांमध्ये काही वेळ भीतीचे वातावरण दिसून आले.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या भूकंपाचे केंद्रस्थान आसाममधीलच उदलगुडी जिल्ह्यात, जमिनीपासून




५ किलोमीटर खोलीवर नोंदवले गेले. ता भूकंपाचे धक्के भुटान आणि बांगलादेशच्या उत्तरेकडील भागांपर्यंत पोहोचले आहेत. सुदैवाने, या भूकंपात कुणीही जखमी झाल्याची किंवा कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती समोर आलेली नाही. याआधीही, २ सप्टेंबर २०२५ रोजी, म्हणजे सुमारे दोन आठवड्यांपूर्वी, आसाममधील सोनितपूर जिल्ह्यात भूकंपाचे धक्के जाणवले होते. त्या भूकंपाची तीव्रता ३.५ रिश्टर स्केल होती.







## पवनच्या कुटुंबाला मदत करणार : राज्यमंत्री नाईक

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१४ सप्टेंबर -**

बंजारा समाजाला एस टी आरक्षण मिळावा या मागणीसाठी मुरूम मधील नाईक नगर तांड्यातील ३२ वर्षीय पवन चव्हाण याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी घडली होती.



या कुटुंबाला सांत्वन करण्यासाठी रविवारी दुपारी राज्याचे अदिवासी विकास पर्यटन व उद्योग विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी नाईकनगर तांडा येथे प्रत्यक्ष येऊन मयत पवन चव्हाण यांच्या कुटुंबाला सांत्वनपर भेट दिली व कुटुंबातील व्यक्तींना मदत देऊन पुढील भविष्यासाठी मयत पवन यांच्या पत्नीला सरकारी नौकरी मिळवून देण्यासाठी प्रयत्न असेल असे आश्वासन दिली आहेत.

यावेळी आ. प्रवीण स्वामी, माणिकराव राठोड, सरपंच युवराज राठोड, तसेच तहसीलदार येरमे यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

# तेर परिसरात पावसाचा हाहाकार; तेरणा नदीला महापूर

▸▸ अनेक गावांना पुराचा धोका... ▸▸ मुसळधार पावसामुळे तेरणा मध्यम प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला... ▸▸ नदी काठच्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण...







**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१४ सप्टेंबर -**

तेरणा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात शनिवारी दिवसभर आणि रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे तेरणा मध्यम प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने प्रकल्पाचे सर्व दरवाजे उघडले आहेत. त्यामुळे तेरणा नदीच्या पाणीपातळीत प्रचंड वाढ होऊन नदीला महापूर आला आहे. या महापुराचा फटका नदीकाठच्या अनेक गावांना बसला असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे धरणातील पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढली होती. शनिवारी रात्री पाण्याची पातळी धोक्याच्या चिन्हाजवळ पोहोचल्याने, प्रशासनाने तातडीने निर्णय घेत धरणाचे सर्व दरवाजे उघडण्याचा निर्णय घेतला. यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग तेरणा नदीपात्रात सुरू झाला आहे.

नदीपात्रात अचानक वाढलेल्या पाण्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून, शेकडो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे. काही ठिकाणी घरांमध्येही पाणी शिरले आहे.

प्रशासनाने तातडीने मदतकार्य सुरू केले असून, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. नागरिकांनी घाबरून न जाता सुरक्षित ठिकाणी



स्थलांतरित व्हावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

रात्रीपासून सुरू असलेल्या पावसाम ुळे परिस्थिती गंभीर झाली आहे. आम्ही सर्व यंत्रणांना सज्ज ठेवले असून, नागरिकांच्या सुरक्षेला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे, असे स्थानिक प्रशासनाने सांगितले आहे.

पुढील काही तास अत्यंत महत्त्वाचे असून, पावसाचा जोर कायम राहिल्यास परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

### आ. राणाजगजीतसिंह पाटील यांच्याकडून पूरग्रस्त भागाची पाहणी...

मुसळधार पावसामुळे तेर येथे तेरणा नदी दुथडी भरून वाहू लागली असून, नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. नदीकाठच्या भागांमध्ये पाणी शिरल्याने स्थानिकांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर तेर येथील नदीकाठच्या परिसराची प्रत्यक्ष पाहणी आ. राणाजगजीतसिंह पाटील यांच्या कडून करण्यात आली. नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाला आवश्यक त्या महत्त्वाच्या सूचना दिल्या. विशेषतः पेठ परिसरातील नागरिकांनी अधिक सतर्क राहून खबरदारी घ्यावी, असे आवाहन यावेळी त्यानी केले.

यावेळी तहसीलदार डॉ. मृणाल जाधव, सतीश दंडनाईक,दत्ता देवळकर, पद्माकर फंड, श्रीमंत फंड, भास्कर माळी, गणेश फंड, तलाठी प्रशांत देशमुख, सुमेध वाघमारे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

## ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### धाराशिवमध्ये शालेय स्पर्धांना प्रतिसाद

**धाराशिव, दि.१४ सप्टेंबर -**

प.पु.श्री. अनंतदास महाराज यांच्या ६२ व्या पुण्यतिथीनिमित्त श्री. अनंतदास महाराज स्मारक मंडळाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. आर्य चाणक्य विद्यालयात झालेल्या या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. अनंतदास महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष अॅड. मिलिंद पाटील, कार्यवाह गोविंदराव अयाचित आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बडबडगीत गायन, मनाचे श्लोक, क्रांतीकारक व महापुरुषांच्या वेशभूषा, चित्र रंगभरण, कथा कथन, भावगीत-भक्तीगीत गायन, भारुड, भजन, बासरी-संतूर मुक्त वादन, चित्रकला, सुंदर हस्ताक्षर, भाषण, निबंध लेखन, विना वाद्य गीत अशा स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धांचे परिक्षण डॉ. मारुती गोरे, डॉ. कृष्णा तेरकर, डॉ. सहदेव रसाळ, प्रा. प्रशांत गुरव, प्रा. शशिकांत देशमुख, अभिजीत केसकर, राजगुरू, माने यांनी केले.



### तालुक्यात खो-खो मध्ये जवाहर अव्वल

**अणदूर, दि.१४ सप्टेंबर**

तुळजापूर तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा(दि.१२ व १३ सप्टेंबर) रोजी जवाहर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मैदानावर संपन्न झाल्या. या तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत सर्वच माध्यमिक माध्यमिक शाळांचा सहभाग होता. वय वर्ष सतरा मुलींचा खो-खो संघ प्रथम, वय वर्ष सतरा मुलांचा संघ प्रथम व वय वर्ष चौदा मुलांचा संघ प्रथम असा खेळ करून तालुक्यातून अव्वल ठरले आणि जिल्हास्तरीय खो-खो सामन्यासाठी निवड झाली. खो-खो खेळाडूंना क्रीडाशिक्षक जयहिंद पवार, राजेश गीते, ठाकरू राठोड, दादाराव घोडके, प्रणीलकुमार बनसोडे, अंकुश मोकाशे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. मार्गदर्शक क्रीडा शिक्षक व सर्व खेळाडूंचे संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे, लक्ष्मीकांत पाटील, मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

### कळंबमध्ये सिमेंट विट उद्योगात चोरी

**कळंब, दि.१४ सप्टेंबर**

येथील बाबा नगर रोडवरील भराडे सिमेंट विट उद्योग येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सुमारे ४४ हजारांचा मुद्देमाल लंपास केला.फिर्यादी दत्तात्रय विठ्ठल भराडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१२ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून ते दि.१३ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजेपर्यंत चोरट्यांनी दुकानाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी ट्रॅक्टरचे हायड्रोलिक असेंबली, बोरचे ५० फुट वायर व २५० लोखंडी प्लेट असा एकूण ४४ हजार किंमतीचा माल चोरून नेला.

## तुळजाभवानी देवीच्या मंचकी निद्रेने नवरात्र महोत्सवास प्रारंभ

▸▸ देवीच्या मंचकी निद्रेसाठी पंचकोशीतील महिला भक्तांनी गादीचा कापूस पिंजला... २२ सप्टेंबर रोजी होणार घटस्थापन...





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ सप्टेंबर -**

श्री तुळजाभवानी देवीच्या नवरात्र महोत्सव १४ सप्टेंबर ते ८ ऑगस्टपर्यंत पर्यंत होणार असून १४ सप्टेंबर रोजी तुळजाभवानी मंदिरात देवीच्या मंचकीनिद्रेसाठी भाविक भक्तांनी देवीच्या चांदीच्या पलंगावरील गादीचा कापूस पिंजून काढला. पंचकोशीतील आराधी महिला भाविक भक्त गोंधळी महिला यांनी मंदिरात देवीच्या गादीचा कापूस पिंजण्यासाठी गर्दी केली होती.

जागा मिळेल तिथे महिला देवीचे गाणे म्हणत कापूस पिंजत होत्या.

येणाऱ्या पंधरा दिवसांमध्ये नवरात्र उत्सवातील विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन मंदिर संस्थांनी केले आहे.

१४ सप्टेंबर दिवशी तुळजाभवानी देवीच्या मंचकी निद्रेस प्रारंभ झाला आहे. नऊ दिवसाच्या मंचकी निद्रेनंतर देवीची मूळ सिंहासनावर प्रतिष्ठापना होऊन नित्योपचार पूजेनंतर २२ सप्टेंबर मंगळवार रोजी घटस्थापनेने देवीच्या नवरात्र उत्सवास प्रारंभ होईल.

## नांदगावमध्ये स्वयंशिक्षण संस्थेच्या माध्यमातून महिलांसाठी शेती प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१४ सप्टेंबर -**

नांदगाव येथे स्वयंशिक्षण संस्थेच्या माध्यमातून सुरक्षित शेती व पर्यावरण पूरक शेती या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत ५३ गावातील ४५० महिलांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणात VG (Village ction Group) गटाच्या माध्यमातून महिलांच्या भूमिका, जबाबदारी आणि नेतृत्व विकास यावर सुसंवाद साधला गेला. प्रशिक्षणाचा उद्देश तळागाळातील गरीब व गरजू महिलांचा शाश्वत विकास करणे, त्यांचे हक्क व अधिकार सुनिश्चित करणे, आर्थिक व नेतृत्व कौशल्ये विकसित करणे असे आहे. कार्यक्रमात महिलांना स्वयंव्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले गेले, ज्यामध्ये स्वतःचे जीवन ओळखणे, रागावर नियंत्रण, समस्या सोडवण्याच्या उपाययोजना, व्यवसाय उभा करण्याचे प्रयत्न, तसेच शासकीय योजनांचा लाभ सर्व महिलांपर्यंत पोहोचवणे यांचा समावेश होता.

संस्थेच्या मार्गदर्शनाखाली तालुका समन्वयक जयश्री धनंजय काळे आणि मार्गदर्शक देवकन्या जगदाळे यांनी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

## नंदगाव येथील दारू विक्री तातडीने बंद करा

### महास्वामीजींचा आमरण उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१४ सप्टेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील नंदगाव येथे अनेकांचे जीव घेणारी दारू




विक्री तातडीने बंद करण्यात यावी, अन्यथा आपण आमरण उपोषणास बसू असा इशारा येथील मठाधिपती राजशेखर महास्वामीजी यांनी दिला आहे.

ग्रामपंचायतीने दारूबंदीचा ठराव घेतला असून ८६६ महिलांनी स्वाक्षरी मोहीम राबवली आहे. मात्र उत्पादन शुल्क अधिकारी आणि संबंधित प्रशासन दारू विक्रेत्यांना पाठबळ देत असल्याचा आरोप महास्वामीजींनी केला.

महास्वामीजींनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नंदगावमध्ये आतापर्यंत जवळपास ५० जणांचा दारूमुळे मृत्यू झाला असून अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. तरीही प्रशासनाने ग्रामपंचायतीचा ठराव व महिलांचे निवेदन दुर्लक्षित करून दारू विक्रेत्यांना अभय दिले आहे.

येत्या मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनापर्यंत (१८ सप्टेंबर) दारू विक्री बंद न केल्यास दि.१९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता हुतात्मा स्मारक, नंदगाव येथे आपण आमरण उपोषणास बसणार आहोत व अंतीम निर्णय होईपर्यंत माघार घेणार नाही, असा इशारा ७८ वर्षीय वयोवृद्ध मठाधिपती राजशेखर महास्वामीजींनी दिला आहे.



## आरळी बुद्रुक येथे शिक्षकांचा निरोप व स्वागत समारंभ



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ सप्टेंबर -**

तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील प्रशालेत ऑनलाईन बदली प्रक्रियेतून बदली झालेल्या तसेच नव्याने रुजू झालेल्या शिक्षकांचा भव्य निरोप व स्वागत समारंभ शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला.

मागील सात वर्षे कार्यरत राहून विद्यार्थ्यांना विद्यादान करणारे शिवानंद साखरे, चंद्रकांत उळेकर, दिलीप चव्हाण, सुधीरसिंग चव्हाण व स्वप्नील माशाळकर यांचा सन्मानपूर्वक निरोप घेण्यात आला.

त्यांच्या जागी नव्याने रुजू झालेले विनायक बोदर, प्रमोद चौधरी, देशभूषण दुरुगकर, प्रीती अंबुरे व संकल्पना तांबे यांचा स्वागत सत्कार करण्यात आला.


या कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष रामेश्वर तानवडे, प्रशालेचे अध्यक्ष मकरंद बामणकर, फौजदार संजय पारवे, गोविंद पारवे यांच्यासह अनेक मान्यवर व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळासाहेब घेवारे यांनी केले तर आभार रामेश्वर तानवडे यांनी मानले.

## भुममध्ये गोवंशाची बेकायदेशीर वाहतूक उघडकीस

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ सप्टेंबर -**

एस.पी. कॉलेज, पार्डी रोड परिसरात भुम पोलिसांनी मोठी कारवाई करत ६ जिवंत व ३४ मृत अशा एकूण ४० गोवंशीय वासरांची बेकायदेशीर वाहतूक करणारा पिकअप वाहनासह ताब्यात घेतला. जप्त मालमत्तेची किंमत सुमारे ४.६० लाख इतकी आहे.

दि.१३ सप्टेंबर रोजी दुपारी २.३७ वाजता ही कारवाई करण्यात आली. आरोपी रेहान आल्ताफ शेख (वय १९, रा. बारलोणी ता. माढा, जि. सोलापूर)



व एका विधी संघर्ष बालकाला पोलिसांनी अटक केली आहे. हे वासरे कत्तलीसाठी निर्दयतेने, चारा-पाणी न देता वाहतूक केली जात असल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले. या प्रकरणी भुम पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

## सोनारी येथे आयोजित जनता दरबारास नागरिकांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१४ सप्टेंबर -**

तालुक्यातील सोनारी ग्राम पंचायत सभागृहात भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित जनता दरबारास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या दरबारात १४७ लेखी तक्रारींची नोंद घेण्यात आली असून काही तक्रारींचा तत्काळ निपटारा माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधून केला.



भाजपाकडून प्रत्येक विभागाचे प्रमुख नेमण्यात आले असून १२ सप्टेंबरपर्यंत सर्व तक्रारींचे निराकरण करण्याचे आश्वासन देण्यात आले.

यावेळी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, तालुकाध्यक्ष अरविंदबप्पा रगडे, जिल्हा उपाध्यक्ष अॅड. संतोष सुर्यवंशी, जिल्हा सरचिटणीस अॅड. गणेश खरसडे, प्रदेश उपाध्यक्ष अॅड. जहीर चौधरी, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, तसेच विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जरंडीतील विविध भागांना विशिष्ट नामकरण;-मासिक सभेत ठराव मंजूर

सोयगाव,दि.१४ सप्टेंबर – थोर महापुरुषांच्या कार्याला पुन्हा उजाळा मिळावा यासाठी जरंडी ग्रामपंचायतीने गावातील विविध भागांना, चौकांना थोर महापुरुषांचे नावे देण्याचा ठराव शनिवारी मासिक सभेत घेवून मंजूर केला आहे दरम्यान येत्या तीस सप्टेंबरला या महापुरुषांच्या नावाचे फलक लावण्यात येणार असल्याचे ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांनी सांगितले

सरपंच स्वाती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायतीचा मासिक सभेत मागील झालेल्या बैठकीचा वृत्तांत वाचन करून गावातील विविध भागांना व चौकांना थोर महापुरुषांच्या नावे नामकरण करण्याचा ठराव उपसरपंच संजय पाटील यांनी मांडला या ठरावाला ग्रामपंचायत सदस्य मधुकर पाटिल यांनी अनुमोदन देत हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला यामध्ये गावातील हुतात्मा स्मारक चौकला छत्रपती शिवाजी महाराज चौक,गावाच्या प्रवेशद्वार चौकाला शहीद विष्णू चव्हाण चौक,आरोग्य केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्याच्या चौकाला संत सेवालाल महाराज चौक,राम नगर कडे जाणाऱ्या चौकाला बिरसा मुंडा चौक,जरंडी ते निंबायती कडे जाणाऱ्या रस्त्यावर चौकाला डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक,स्मशानभूमी चौकाला डॉ अब्दुल कलाम चौकप्राथमिक शाळे जवळील रस्त्याला ,हुतात्मा कालिदास राजहंस मार्ग असे नामकरण करण्यात आले आहे( दि.३०) सप्टेंबरला सदर नामफलक उभारण्यात येणार आहे

## महसूल विभाग १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा पंधरवाडा' अभियान राबविणार

अहिल्यानगर, दि.१३ : महसूल व वन विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवाडा' हे विशेष अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत राज्यभर राबविण्यात येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त व महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महसूल विभागाच्या सेवा अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि पारदर्शक बनवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानांतर्गत विविध उपक्रम युद्धपातळीवर राबवले जाणार आहेत, जेणेकरून सामान्य जनतेच्या दैनंदिन समस्यांचे निराकरण होईल. या 'सेवा पंधरवाडा' अभियानाची अंमलबजावणी तीन टप्प्यांत केली जाणार आहे :

पहिला टप्पा : पाणंद रस्ते विषयक मोहीम (१७ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर) – या कालावधीत पाणंद / शिवार रस्त्यांना क्रमांक देणे, त्यांचे सर्वेक्षण करणे, गावाच्या नकाशावर चिन्हांकित करणे आणि निस्तार पत्रकात नोंद नसलेल्या रस्त्यांची नोंद करणे यावर लक्ष केंद्रित केले जाईल. तसेच, शेतावर जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी संमतीपत्रे घेणे आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी 'रस्ता अदालत' आयोजित केली जाईल.

दुसरा टप्पा : 'सर्वांसाठी घरे' उपक्रम (२३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर)– या टप्प्यात 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमासाठी पूरक कार्यवाही केली जाईल. यामध्ये घरे बांधण्यासाठी उपलब्ध असलेली शासकीय जमीन कब्जेहक्काने देणे, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुसार नियमित करणे आणि अतिक्रमण नियमित केलेल्या तसेच जमीन वाटप झालेल्या लाभार्थ्यांना जमिनीचे पट्टे वाटप करणे या बाबींवर भर दिला जाईल.

तिसरा टप्पा : नावीन्यपूर्ण उपक्रम (२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर) – या अंतिम टप्प्यात जिल्हाधिकारी स्थानिक परिस्थिती व गरजा लक्षात घेऊन नावीन्यपूर्ण उपक्रम राबवतील. या अभियानात स्थानिक लोकप्रतिनिधी जसे की विधानसभा/विधान परिषद सदस्य, संसद सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि ग्रामपंचायत सदस्यांना सहभागी करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या अभियानामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा यथोचित सन्मान केला जाणार आहे. उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी या अभियानासाठी नियोजन करून, ते यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी दिल्या आहेत.

## एमजीएममध्ये सुपरनोव्हा तांत्रिक महोत्सवाचे आयोजन



छत्रपती संभाजीनगर, दि.१४ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'सुपरनोव्हा : स्पार्क द फ्युचर' या दोन दिवसीय तांत्रिक महोत्सवाचे शुक्रवार, दिनांक १९ सप्टेंबर २०२५ ते शनिवार, दिनांक २० सप्टेंबर २०२५ दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवार, दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता रुक्मिणी सभागृह येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थतीत संपन्न होणार आहे.

या महोत्सवाच्या नोंदणीची सुरूवात विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. एच.एच.शिंदे, संचालिका डॉ.परमिंदर कौर, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

या दोन दिवसीय महोत्सवात हॅकाथॉन, प्रोजेक्ट, स्टार्टअप पिचिंग, रोबोरेस, कम्पेटिटिव्ह प्रोग्रामिंग, ई–स्पोर्ट्स, टेक्निकल वर्कशॉप्स तसेच ज्युनिअर शार्क्स अशा तांत्रिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांना आपल्यातील कौशल्य, नाविन्य आणि कल्पना सादर करण्यासाठी एक व्यासपीठ या महोत्सवाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या महोत्सवासाठी एन्ड्रेस+हाउझर व आयएसएचआरएई हे इव्हेंट पार्टनर असून टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) हे नॉलेज पार्टनर तर एसएचएल हे अस्सेसमेंट पार्टनर म्हणून काम पाहणार आहेत.

महोत्सवाच्या नोंदणीसाठी विद्यार्थी स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे अधिकृत सोशल मीडिया हँडल्स पाहू शकतात अथवा अधिकृत पोस्टरवरील क्यूआर कोड स्कॅन करून सहभागी होऊ शकतात. अधिक माहितीसाठी विद्यार्थी ९५२९७४३३०१, ७२७६६६४७५७, ७०५८५१६७०८ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

## शक्ती एनर्जी सोल्युशन्स ने लाँच केले एआय-आधारित इन्व्हर्टर आणि भारत-रेडी सोलर रूफटॉप

छत्रपती संभाजीनगर – आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक ठोस पाऊल टाकत, शक्ती एनर्जी सोल्युशन्सने शेरेटनमधील फोर पॉइंट्स हॉटेलमध्ये चॅनल पार्टनर्स आणि डीलर्ससाठी भव्य लाँचिंग कार्यक्रम आयोजित केला होता.या कार्यक्रमात प्रमुख भागीदार आणि स्टेकहोल्डर्सनी सहभाग घेतला आणि कंपनीच्या 'भारताला स्वच्छ व शाश्वत ऊर्जेच्या दिशेने वेगाने पुढे नेणे' या उद्दिष्टाचा पुनरुच्चार केला. या कार्यक्रमात कंपनीने 'मेड इन भारत, मेड फॉर भारत' या विचारातून विकसित केलेली नेक्स्ट जनरेशन सोलर रूफटॉप सिस्टिम सादर केली. शक्ती एनर्जी सोल्युशन्सचे सीईओ, श्री रामकृष्ण सतलुरीम्हणाले: शक्ती सोलर रूफटॉप हे उच्च दर्जाचे सोल्युशन्स असून, ते 'मेड इन भारत, मेड फॉर भारत' या तत्त्वज्ञानावर आधारित आहेत. ही प्रणालीखास भारतीय हवामानासाठी तयारकरण्यात आली आहे, ज्यामुळे उत्तम ऊर्जा उत्पादन, अधिक टिकाऊपणा आणि विषम हवामान परिस्थितीतही उत्कृष्ट कामगिरी बजावतात. अपडेटेड मॉनिटरिंग सिस्टिममुळे ग्राहक आता रिअल–टाइममध्ये ऊर्जा उत्पादन तपासू शकतील, ज्यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि स्मार्ट एनर्जी मॅनेजमेंट शक्य होईल.

## एआय-आधारित इन्व्हर्टर आणि भारत-रेडी सोलर रूफटॉप लाँच

नांदेड / बीड – शक्ती एनर्जी सोल्युशन्सचे सीईओ, श्री रामकृष्ण सतलुरीम्हणाले: शक्ती सोलर रूफटॉप हे उच्च दर्जाचे सोल्युशन्स असून, ते 'मेड इन भारत, मेड फॉर भारत' या तत्त्वज्ञानावर आधारित आहेत. ही प्रणालीखास भारतीय हवामानासाठी तयारकरण्यात आली आहे, ज्यामुळे उत्तम ऊर्जा उत्पादन, अधिक टिकाऊपणा आणि विषम हवामान परिस्थितीतही उत्कृष्ट कामगिरी बजावतात. अपडेटेड मॉनिटरिंग सिस्टिममुळे ग्राहक आता रिअल–टाइममध्ये ऊर्जा उत्पादन तपासू शकतील, ज्यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि स्मार्ट एनर्जी मॅनेजमेंट शक्य होईल.शक्ती पंप्सच्या विश्वासार्हतेमुळे, शक्ती एनर्जी सोल्युशन्स आता सौर ऊर्जा उद्योगात एक मोठा आणि विश्वासार्ह ब्रँड बनत आहे. हे ब्रँड सोलर पॅनेल, इन्व्हर्टर आणि मॉड्यूल माउंटिंग स्ट्रक्चर्स, अशा सर्व गोष्टी एकाच ठिकाणी उपलब्ध करून देते.

## ॲमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल २०२५ पूर्वी 'अर्ली डील्स'ची घोषणा केली

छत्रपती संभाजीनगर – मेझॉन डॉट इन ने आज ॲमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल २०२५ पूर्वी 'अर्ली डील्स'ची घोषणा केली, ज्याअंतर्गत ग्राहकांना १३ सप्टेंबरपासून आकर्षक प्री–फेस्टिव्हल ऑफर्स मिळतील. मुख्य फेस्टिव्हल २३ सप्टेंबरपासून सुरू होईल, ज्यात प्राइम सदस्यांना २४ तास आधी विशेष प्रवेश मिळेल. या वर्षीच्या शॉपिंग फेस्टिव्हलमध्ये वाढवलेले डिलिव्हरी नेटवर्क्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)–सक्षम खरेदी साधने आणि खास मनोरंजनाचे पर्याय यामुळे खरेदीचा अनुभव अधिक समृद्ध होणार आहे. प्राइम सदस्यांना संपूर्ण ग्रेट इंडियन फेस्टिव्हलमध्ये विशेष मूल्य मिळणार आहे. २४ तास आधी मिळणाऱ्या प्रवेशाशिवाय, प्राइम सदस्य प्राइम धमाका ऑफर्स अनलॉक करू शकतील – विशेष लाइटनिंग डील्स आणि फक्त प्राइम सदस्यांसाठी उपलब्ध असलेल्या ऑफर्स संपूर्ण फेस्टिव्हल काळात देण्यात येतील.ॲमेझॉन आपल्या ॲमेझॉन इन्फ्लुएंसर कार्यक्रमातून शॉपेबल कंटेंटच्या माध्यमातून डील्स सादर करण्यासाठी समीरा रेड्डी, राजीव मखनी आणि रणवीर ब्रार यांच्यासह १ लाखांहून अधिक क्रिएटर्सना सहभागी करणार आहे. या उपक्रमात इलेव्हेट, फॅशन, होम आणि नवीन टेक इन्फ्लुएंसर कार्यक्रम यांसारख्या विशेष कार्यक्रमांचा समावेश असून, यात ३,००० पेक्षा जास्त क्रिएटर्स सहभागी होणार आहेत.

## भारतातील कार्डिओलॉजीसाठीचा पहिला परवानाधारक एआय डॉक्टर असिस्टंट

मुंबई: लक्षणे दिसण्यापूर्वीच हृदयरोग रोखण्यासाठी डिझाइन केलेली एक क्रांतिकारी प्रगत प्रणाली अँजिनॅक्स एआय, जसलोक हॉस्पिटलमध्ये लाईव्ह झाली आहे.भारतात विकसित, अँजिनॅक्स एआय ही देशातील पहिली परवानाधारक एआय डॉक्टर असिस्टंट आहे जी ओपीडीसाठी आहे. डॉक्टरांना मूक दीर्घकालीन जोखीम लवकर ओळखण्यास आणि प्रतिबंधात्मक कृती करण्यास मदत करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे, ज्यामुळे हृदयविकाराच्या झटक्यासारख्या आपत्कालीन परिस्थितीची शक्यता लक्षणीयरीत्या कमी होते ज्यासाठी रुग्णवाहिका कॉलची आवश्यकता असते.अँजिनॅक्स एआयचे संस्थापक आणि सीईओ नमन गोसालिया म्हणाले, भारताला अधिक आयसीयूची आवश्यकता नाही, परंतु कमी लोक त्यात जातात. अँजिनॅक्स प्रत्येक डॉक्टरला एक प्रतिबंधात्मक साथीदार देतो जो धोका लवकर ओळखतो आणि योग्य पुढील पावले उचलतो, जेणेकरून कुटुंबे वेळेवर कारवाई करू शकतील.एआय कार्डिओलॉजिस्ट असिस्टंट जसलोकच्या बाह्यरुग्ण विभागांमध्ये तैनात करण्यात आला आहे आणि आता तो जनतेसाठी उपलब्ध आहे. हे लाइफलाँग हार्ट हेल्थ प्रोफाइल प्रदान करते, एक वैयक्तिकृत हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रेकॉर्ड जो कालांतराने विकसित होतो आणि दीर्घकालीन प्रतिबंधात्मक काळजीला समर्थन देतो.

## झी टीव्हीवरील 'कुमकुम भाग्य'चा ११ वर्षांचा सुंदर प्रवास आता समाप्त!

२०१४ साली झी टीव्हीवरील 'कुमकुम भाग्य'ने आपला अद्भुत प्रवास सुरू केला आणि पहिल्या भागापासूनच ही फक्त एक मालिका न राहता कुटुंबाचा आणि हृदयाचा भाग बनली. देशभरातील लाखो प्रेक्षकांसाठी ही आनंद, दिलासा आणि एकत्रतेचा विश्वासू सोबती ठरली. प्रत्येक भागासोबत, मनाला भिडणाऱ्या कथा, अनपेक्षित वळणे आणि हृदयस्पर्शी क्षणांमुळे प्रेक्षकांनी पात्रांसोबत हसणे, रडणे आणि स्वप्न पाहणे अनुभवले आणि हा प्रवास चुकवणे जवळजवळ अशक्यच ठरले. वर्षानुवर्षे प्रेक्षकांचे अखंड प्रेम, साथ आणि पिढ्यान पिढ्या जोडलेला चाहतावर्ग यामुळे 'कुमकुम भाग्य' खऱ्या अर्थाने घराघरातले आवडते नाव बनले. आता ११ अविस्मरणीय वर्षांनंतर जपलेल्या असंख्य आठवणींनंतर आणि कुटुंबांना प्रत्येक संध्याकाळी टीव्हीसमोर एकत्र आणल्यानंतर, या मालिकेला मनापासून निरोप देण्याची वेळ आली आहे. भारतीय दूरदर्शनच्या सुवर्ण इतिहासात ही कहाणी कायमस्वरूपी एक खास स्थान मिळवून राहील.

## स्वच्छता ही सेवा अभियान ग्रामपंचायतीने प्रभावीपणे राबवावी - आनंद भंडारी

### अभियान कालावधी : १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५

अहिल्यानगर, दि.१३ – स्वच्छ भारत मिशन अंतर्गत महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानुसार दरवर्षीप्रमाणे स्वच्छता ही सेवा (डक्ड) मोहीम १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत ग्रामपंचायतींनी प्रभावीपणे राबवावी, असे आवाहन जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले आहे.

या वर्षीच्या स्वच्छता ही सेवा २०२५ साठी स्वच्छोत्सव ही थीम निश्चित केली असून खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात येणार आहेत –

१७ सप्टेंबर २०२५ रोजी मोहिमेचा शुभारंभ तालुका व गाव पातळीवर परिसर स्वच्छतेच्या उपक्रमाने होणार आहे. स्वच्छता लक्ष युनिट (उढणी) – अस्वच्छ ठिकाणांची निवड करून मॅपिंग व साफसफाई करण्यात येईल. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता – संस्था, प्रतिष्ठान व गर्दीच्या ठिकाणांची स्वच्छता करण्यात येईल. सफाईमित्र सुरक्षा शिबिरे – सफाईमित्रांसाठी एक खिडकी योजना राबवली जाईल. आरोग्य कॅम्पद्वारे त्यांची तपासणी होईल. तालुका पातळीवर डिग्रिटी कॅम्प घेऊन वैयक्तिक लाभाच्या शासकीय योजनांचा लाभ सफाईमित्रांना दिला जाईल. क्लीन ग्रीन उत्सव – पर्यावरणपूरक व शून्य कचरा उत्सव साजरा केला जाईल. प्रबोधनपर उपक्रम – स्वच्छ सुजल गाव, कचऱ्यापासून कलाकृती, स्वच्छ स्ट्रीट फूड केंद्र आदी. एक दिवस – एक घंटा – एक सोबत : २५ सप्टेंबर २०२५ रोजी देशव्यापी श्रमदान होणार असून जिल्ह्यातील सर्व घटकांचा सहभाग राहील. हागणदारीमुक्त अधिक मॉडेल गाव व स्वच्छ सुजल गाव विशेष ग्रामसभेत घोषित करता येतील. या विशेष ग्रामसभा १७ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहेत.

## तालुक्यात मारहाणीची घटना; पोलिसांत गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

कन्नड – दि. १४ सप्टेंबर – कन्नड तालुक्यातील आलापूर येथे शेजाऱ्यांकडून मारहाणीची घटना घडली असून याप्रकरणी देवगाव रं पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अनिल सुभाष शिरसाठ (वय ३५ वर्षे, व्यवसाय – मजुरी, राहणार – अलापूर, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, शेतात काम करत असताना त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबीयांवर हल्ला करण्यात आला.

तक्रारीत त्यांनी नमूद केले की, जनार्दन बाळुराव कोरडे, विजय बाळुराव कोरडे, किरण जनार्दन कोरडे आणि बंटी योगेश कोरडे या चार जणांनी त्यांना शिवीगाळ करत मारहाण केली. तसेच त्यांच्या आईच्या नावाचा वापर करून अपमान करण्याबरोबरच जीवितास धोका निर्माण केला.तसेच त्यांच्या वडिलांना बेदम मारहाण करण्यात आली ही घटना दि.१२ रोजी सकाळी सुमारे १० वाजेच्या सुमारास घडली. अनिल यांचे आई वडील शेतात मशागतीसाठी गेले असता आरोपींनी त्यांना अडवून मारहाण केली. मारहाणीमुळे शिरसाठ यांच्या अंगावर जखमा झाल्या असून त्यांच्यावर प्राथमिक उपचारासाठी सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.पोलिसांनी तक्रार दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. गावात या घटनेने खळबळ उडाली असून ग्रामस्थांनी कायद्यावर विश्वास ठेवण्याचे आणि संयम राखण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## वेताळवाडी येथील नामफलकला विद्रुप करणाऱ्यावर गुन्हा दाखल करुन अटक करण्याची मागणी



सोयगाव,दि.१४ सप्टेंबर – लोकनेते तालुक्याचे भाग्यविधाते व वेताळवाडी धरणाचे निर्माते कै.बाबुरावजी काळे यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांच्या दि.९ सप्टेंबर २०२४ रोजी जन्मशताब्दी वर्षानिमित्त सर्व पक्षीय पदाधिकाऱ्यांच्या सहमतीने वेताळवाडी मध्यम प्रकल्पाला कै.बाबुरावजी काळे जलाशय असे नामकरण करण्यात आले होते.त्या फलकावरील कै.बाबुरावजी काळे यांचे नाव पुसल्याचा धक्कादायक प्रकार गुरुवारी उघडकीस आल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.या प्रकरणी शुक्रवारी सोयगाव पोलीस ठाण्यात शहरवासीयांनी कारवाई साठी लेखी निवेदन दिले आहे.

लोकनेते,सहकार महर्षी कै.बाबुरावजी काळे यांचे या मातीस अमृततुल्य योगदान असून त्यांनीच हे वेताळवाडी धरण बांधले आहे.व सद्या त्यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू असून त्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून या धरणास सर्वानुमते जनतेच्या मागणी नुसार माजी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांच्या संकल्पमेतून व सर्व पक्षीय पदाधिकारी यांच्या सहमतीने दि.९ सप्टेंबर २०२४ लोकनेते कै.बाबुरावजी काळे जलाशय हे नाव देण्यात आले व तसा फलक ही त्या भागात लावण्यात आला होता.याच फलकावर असलेले कै.बाबुरावजी काळे हे नाव पुसल्याचा धक्कादायक प्रकार गुरुवारी उघडकीस आल्याने तालुक्यातून संताप व्यक्त केला जात आहे.

दरम्यान वेताळवाडी येथील कै.आप्पासाहेब बाबुरावजी काळे जलाशय येथील नामफलकला विद्रुप करणाऱ्या प्रवृत्तीला गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी यासाठी शुक्रवारी सोयगाव पोलीस ठाण्यात येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांना लेखी निवेदन देण्यात आले.यावेळी रवींद्र काळे,राजेंद्र काळे,नगरसेवक हर्षल काळे,कृष्णा पाटील,निलेश गाडेकर,दत्तू निकम,दिपक देशमुख आदी उपस्थित होते.

## उपाध्याय विरंजनसागरजी महाराज यांच्या उपस्थितीत तीन दिवसीय कल्याण मंदिर विधानाचे भव्य आयोजन

छ.संभाजीनगर प्रतिनिधी – श्री.१००८ पुष्पदंत दिगंबर जैन मंदिर चिंतामणी रेसिडेन्सी बीड बाय पास येथे आचार्य डॉ.प्रणामसागरजी महाराज यांच्या आर्शिवादाने व उपाध्याय विरंजनसागरजी महाराज विनिशोधसागरजी महाराज, विसौम्यसागरजी महाराज, क्षुल्लिका विशिलाश्री माताजी यांच्या उपस्थितीत तीन दिवसीय १६,१७,१८ सप्टेंबर रोजी कल्याण मंदिर विधानाचे व प्रतिमाधारी उपवास धारक भाविकांच्या सन्मान समारोहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. संपुर्ण कार्यकम हा





अनुष्ठाचार्य कपिल भैया यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.

दिनांक १६ सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता संघाचे आगमन, ८ वाजता गुरै पुजन, ८.३० वाजता प्रवचन, १० वाजता आहारचर्या, संध्याकाळी ६.३० वाजता आनंदयात्रा व भगवंताची महाआरती,

दिनांक १७ सप्टेंबर रोजी ४४ मंडळ मांडुन कल्याण मंदिर विधानाची महाआरती आराधना करण्यात येणार आहे. सकाळी ६.३० वा.भगवंताचा अभिषेक, ७.३० वा.विधान प्रारंभ, सकाळी ९ वा प्रवचन, तसेच यावेळी सकाळी ११ वियान अनंता ग्रुप चे विक्रम बोहरा आदेश छाजेड विशाल बोहरा याचा वतीने महाप्रसाद देण्यात येनार आहे संध्याकाळी ६.३० वा. महाआरती, संध्याकाळी ७.३० वा.अनुष्ठाचार्य कपिल भैया हे संत क्यु ? और संत निवास क्यो ? या विषयावर विशेष उदबोधन करणार आहे.

दिनांक १८ सप्टेंबर रोजी सकाळी भगवंताचा अभिषेक, ८ वा.गुरैपुजन, ८.३० वा.प्रतिमाधारी व उपवास धारकांचा सन्मान समारोह, ९.३० वा. प्रवचन, १० वा आहारचर्या होणार आहे.

तसेच यावेळी उपस्थित भाविकांना श्रीमती. विजयादेवी मदनलालजी रावका, विदया पवन रावका, अभय मदनलाल रावका, समकित सी.ए अभिजीत, शौर्य, निधी, श्रृती, रावका परिवार, रावका परिवार बीड बायपास परिवार यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे. तरी समाज बांधवानी वरील कार्यकमास उपस्थित रहावे असे आवाहन श्री.१००८ पुष्पदंत दिगंबर जैन मंदिर चिंतामणी रेसीडेन्सी यांनी केले आहे.

## जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने रामदास फुसे सन्मानित



सोयगाव,दि.१४ सप्टेंबर – जिल्हा परीषद छत्रपती संभाजीनगर चा सन.२०२४–२५ साठीचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार सोयगाव तालुक्यातील जंगलाताडा येथील मुख्याध्यापक रामदास फुसे यांना दि.१२ शुक्रवार रोजी संत एकनाथ नाट्यमंदीर छत्रपती संभाजीनगर येथे पालकमंत्री संजय शिरसाट,मंत्री अतुल सावे,आमदार विक्रम काळे,आमदार प्रशांत बंब,जिल्हाधिकारी दिलीप स्वामी,मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित,प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण व मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सपत्नीक सन्मानित करण्यात आले.यावेळी रामदास फुसे याचे अभिनंदन करण्यासाठी सोयगाव तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे,केंद्र प्रमुख सचिन पाटील,फिरोज तडवी,विकास पवार,दादाभाऊ संसारे,नितीन राजपूत,उमेश महालपुरे,रविंद्र शेळके,दुर्गादास बलाडे,किरणकुमार पाटील,नरेंद्र बारी,प्रताप साळुंखे,दिलीप इगळे,राजेंद्र उबरकर,सय्यद शेख,राहुल सोनार,प्रविण जाधव,प्रशांत पाटील,गजानन कोळी याच्या सह शिक्षक उपस्थित होते.

## पितृपक्षाचे औचित्य साधून प्रतिकूल परिस्थितीत हिंदू संस्कृतीच्या रक्षणासाठी काम केलेल्या नवदधीचीसाठी कृतज्ञ श्रद्धांजली कार्यक्रम

### विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामाचा स्तुत्य उपक्रम

छत्रपती संभाजीनगर – हिंदू संस्कृतीमध्ये भाद्रपदाचा कृष्णपंधरवडा हा पितृपक्ष म्हणून मानला जातो. या पंधरवड्यात पितरांचे म्हणजेच पूर्वजांचे स्मरण कृतज्ञतेने करण्याची परंपरा आहे. आपण आपापल्या घरी हे स्मरण करतोच पण ज्यांनी अवघे विश्वचि माझे घर म्हणत दधिचीप्रमाणे

प्रमाणे आपले सारे जीवन समाजासाठी तसेच हिंदू संस्कृतीच्या रक्षणासाठी खर्च केले त्यांचे स्मरण करणे, त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे. याच कल्पनेतून छत्रपती संभाजीनगर मधील संघ परिवारातील ज्ञात अज्ञात कार्यकर्त्यांचे आणि मराठवाडा मुक्ती संग्रामात धारातीर्थी पडलेल्या शूरवीरांचे पुण्यस्मरण आपण करणार आहोत. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत दिवंगतांच्या कार्याचा आदर्श घेऊन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षात हिंदुत्वाच्या कार्यात अधिक सक्रिय होण्याचा संकल्प करणार आहोत.

या कृतज्ञता कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून रा.स्व.संघ देवगिरी प्रांत संघचालक मा. श्री. अनिलजी भालेराव प्रमुख अतिथी म्हणून पू.स्वामी आत्मेशानंद महाराज चिन्मय मिशन संभाजीनगर आणि मा.श्री.संजयआप्पा बारगजे नैतिक मूल्य शिक्षण क्षेत्र प्रमुख मुंबई क्षेत्र मा.श्री. संजयराव गायकवाड विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत अध्यक्ष यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे

बुधवार दिनांक १७ सप्टें २०२५ रोजी मराठवाडा मुक्ती दिनाच्या दिवशी सकाळी १०:३० वाजता हेडगेवार रुग्णालयाच्या कै.दामूअण्णा दाते सभागृहात संपन्न होणाऱ्या या श्रद्धांजली सभेला आपण सहकुटुंब उपस्थित रहावे असे आवाहन मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार व विश्व हिंदू परिषद संभाजीनगर महानगर मंत्री अभिषेक कादी यांनी केले आहे

## स्व. डॉ. टी.एस. पाटील स्मृतिदिनानिमित्त अभिवादन; इंग्लिश स्कूलच्या नवीन इमारतीचे लोकार्पण

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.१४ सप्टेंबर – शहरातील साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंतर्गत असलेल्या साधना पाटील प्राथमिक विद्यालय, साने गुरुजी माध्यमिक विद्यालय आणि डॉ. टी.एस. पाटील इंग्लिश स्कूल येथे माजी आमदार व संस्थापक अध्यक्ष स्व. डॉ. टी.एस. पाटील यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी 'स्फूर्तीस्थळी' अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मान्यवर, विद्यार्थी, शिक्षकांनी त्यांच्या कार्याचा गौरव करून श्रद्धांजली अर्पण केली.



स्मृतिदिनानिमित्त साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाने नव्याने सुरू केलेल्या डॉ.टी.एस. पाटील इंग्लिश स्कूलच्या नव्या इमारतीचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. मिलिंद पाटील, सचिव टी.एस. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक नरेंद्र पवार यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम पार पडला. यावेळी माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, बाजार समिती संचालक साईनाथ आल्हाड, उपप्राचार्य संतोष मतसागर व मुख्याध्यापक भगवान ठाकरे यांनी स्व. डॉ. पाटील यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

'स्फूर्तीस्थळी' आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांसह विद्यार्थ्यांनी स्व. काकांचा इतिहास वाचून त्यांना अभिवादन केले. संस्थेचे सचिव टी.एस. कदम यांनी व्हॉट्सॲप संदेशाद्वारे विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मार्गदर्शन करून श्रद्धांजली अर्पण केली. याशिवाय विनायकराव पाटील शिक्षण मंडळाच्या वतीने अभियंत्रिकी महाविद्यालयाचे उपप्राचार्य संतोष मतसागर यांनी शाळेस आर्थिक मदत दिली, तर डॉ. सिद्धांत मिलिंद पाटील यांनीही शैक्षणिक कार्यासाठी योगदान दिले.

कार्यक्रमाला साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. मिलिंद पाटील, जयप्रकाश नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष संजय पाटील, माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, बाजार समिती संचालक साईनाथ आल्हाड, संचालक नितीन पाटील, संचालिका शारदा पाटील, संचालिका मंगल गवते, संचालक शाम कदम, प्रा. रंगनाथ लहाने, डॉ. रोहिदास राठोड, डॉ. आनंद मोतींगे, डॉ. विलास पाटील, उपप्राचार्य संतोष मतसागर, माजी नगरसेवक संतोष निकम, बंटी सुरे, साहेबखाँ पठाण, सतीश शर्मा, प्रशांत जालनापुरकर, अविनाश पाटील, नानासाहेब वाळुंजे, प्रमोद पाटोदे, पत्रकार विजयकुमार मांडे यांच्यासह विविध समाजसेवक, डॉक्टर, शिक्षक, पालक व राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल घुगे यांनी केले, तर मुख्याध्यापक नरेंद्र पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मूल्यांचा वारसा लाभल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.


## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# कौशल्य आणि आत्मनिर्भरतेचा 'विक्रम'

देशातील हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये सातत्यपूर्ण घडामोडी होत असतात. या क्षेत्रामध्ये देश वेगाने प्रगती करत आहे. आपल्या देशातील कुशल अभियंते नवनवीन संशोधनाद्वारे अवघ्या जगात नाव कमावत आहेत. अर्थात हे फक्त याच क्षेत्रात घडत नसून अनेक लक्षवेधी उत्पादनांच्या निर्मितीमध्येही देश झेंडे रोवत आहे. भारतीय अभियंते आज संपूर्ण जगात नाव कमावत आहेत. अनेकविध क्षेत्रांमध्ये त्यांचे कौशल्य वादातीत ठरत असून कौतुकाला पात्र ठरत आहे. जगभरातील मान्यवर उद्योगांना आपल्या प्रतिभेच्या माध्यमातून नवी उंची देणारे हे अभियंते भारताचे नावही उज्ज्वल करण्यास सक्षम होतेच, फक्त तसे आव्हान उभे राहत नव्हते. ते अलिकडच्या काळात उभे राहिले. औद्योगीकरणाच्या नव्या युगामध्ये सेमीकंडक्टर्स अर्थात मायक्रोप्रोसेसर चिपचा दबदबा चांगलाच वाढला आहे. कार्स, मोबाईल, संगणक आणि इतर असंख्य इलेक्ट्रॉनिक उत्पादनांमध्ये हा एक अत्यंत महत्त्वाचा भाग बनला आहे. या चिपच्या निर्मितीमध्ये चीन, तैवान असे काही मोजके देश अग्रेसर असून त्यांच्याकडून होणाऱ्या पुरवठ्यामध्ये व्यत्यय आल्यास आपल्याला बराच ताण सहन करावा लागतो. असा ताण सहन करण्याचे प्रसंग भारताने अनेकदा अनुभवले. त्यातूनच या क्षेत्रामध्ये आत्मनिर्भर होण्याची गरज पुढे आली. गरज ही शोधाची जननी असते, या न्यायाने अलिकडच्या काळात आपण स्वतंत्रपणे प्रयत्न करून सेमीकंडक्टरच्या निर्मितीमध्ये मुसंडी मारली. यातूनच पुढे आलेले चित्र स्पृहणीय ठरत आहे. भारताने विक्रम ३२०१ हा पूर्णपणे स्वदेशी ३२-बिट मायक्रोप्रोसेसर तयार करण्यात यश मिळवले, ही एक महत्त्वाची बातमी आहे.

भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) डिझाईन आणि विकसित केलेली ही चिप म्हणजे भारताचा डीप-स्पेस (अत्यंत प्रतिकूल वातावरणात वापरण्यायोग्य) मायक्रोप्रोसेसर असून आत्मनिर्भर भारत मोहिमेतील ही एक मोठी झेप मानली जात आहे. विक्रम सेमीकंडक्टर चिप ही भारताला आत्मनिर्भर बनवण्याच्या आणि इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात क्रांती घडवून आणण्याच्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ही चिप देशाच्या संरक्षणासाठी, दळणवळणासाठी आणि तांत्रिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. ही चिप संपूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित असून भारतीय इलेक्ट्रॉनिक क्षेत्रावर दूरगामी तिचा प्रभाव पडणार आहे. आतापर्यंत आपली ओळख सॉफ्टवेअर सेवा क्षेत्रातील दीर्घ यशावर आधारित होती. अनेक विश्लेषक कमी पगारात काम करू शकणारे संगणक अभियंते व संख्यात्मक फायदा असे यामागील कारण सांगत असत. इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात सुटे भाग आयात करून त्याची जुळणी करून उत्पादन विक्री असे व्यवसायाचे स्वरूप होते. मोबाईल, संगणक, लॅपटॉप, टीव्हीपासून वॉशिंग मशीनवर 'असेम्ब्लड इन इंडिया' अशी ओळ आढळायची. विक्रम ३२-बिट प्रोसेसर ही भारताची पहिली पूर्ण स्वदेशी सेमीकंडक्टर चिप आहे. ही चिप इस्रोच्या सेमीकंडक्टर लॅबमध्ये तयार झाली असून, स्पेस ग्रेड-हाय रिलायबिलिटीसाठी डिझाईन केली गेली आहे. ती -५५ ते



१२५ या तापमानात कार्यक्षमतेने चालू शकते, जे भारताच्या अंतराळ, संरक्षण आणि औद्योगिक गरजांसाठी आवश्यक आहे. मोबाईल, संगणक, गाड्या, उपग्रह, फाईटर जेट्स, औद्योगिक उपकरणे यासारख्या विविध इलेक्ट्रॉनिक यंत्रणांसाठी हा आधारस्तंभ ठरेल.

सेमीकंडक्टर चिप्स आधुनिक शस्त्रास्त्रप्रणाली, दळणवळण उपकरणे आणि गुप्तचर प्रणालीचा एक अविभाज्य भाग आहेत. भारताने स्वतःची चिप विकसित केल्यामुळे परदेशी चिप्सवरील अवलंबित्व कमी होईल. यामुळे सायबर हल्ल्यांचा धोका कमी होतो आणि संवेदनशील माहिती सुरक्षित राहते. विक्रम चिपच्या निर्मितीमुळे नवीन उद्योग, रोजगार आणि तांत्रिक प्रगतीला चालना मिळेल. यामुळे भारताची इलेक्ट्रॉनिक उत्पादनासाठी परदेशी बाजारपेठेवरील निर्भरता कमी होईल आणि देशांतर्गत उत्पादन वाढेल. यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल. डिजिटल इंडिया कार्यक्रमाला गती देण्यासाठी स्वदेशी चिप्स खूप महत्त्वाच्या आहेत. सरकारी सेवा, आरोग्यसेवा, शिक्षण आणि ई-कॉमर्स यासारख्या क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी या चिप्सची गरज आहे. चिपच्या निर्मितीसाठी संशोधन आणि विकास आवश्यक आहे. यामुळे शैक्षणिक संस्थांमध्ये सेमीकंडक्टर तंत्रज्ञानावर अधिक लक्ष केंद्रित केले जाईल. ज्यामुळे नवीन संशोधनाला चालना मिळेल आणि कुशल मनुष्यबळ तयार होईल. विक्रम चिपमुळे भारताला 'डिजिटल डायमंड' मानले जात आहे. सेमीकंडक्टर हे प्रत्येक इलेक्ट्रॉनिक उपकरणाचे हृदय असल्याने तंत्रज्ञानातील स्वावलंबन हे देशाच्या संरक्षण, ऊर्जा, आरोग्य, वाहतूक आणि अवकाश क्षेत्रासाठी महत्त्वाचे ठरते.

आजवर भारताला सेमीकंडक्टर आणि चिप्ससाठी १.७६ लाख कोटी रुपयांचा खर्च करावा लागत असे. स्वदेशी उत्पादनामुळे आयात खर्चात घट होईल, परकीय चलन वाचेल आणि देशांतर्गत इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्राला चालना मिळेल. भारताला तांत्रिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनवण्यासाठी ही चिप अत्यंत महत्त्वाची आहे. परदेशी चिप्सवरील अवलंबित्व कमी झाल्यामुळे, परदेशी निर्बंधांचा परिणाम होणार नाही. विक्रम चिपच्या निर्मितीमुळे चिप डिझाईन, उत्पादन आणि चाचणी तंत्रज्ञान विकसित होईल. यामुळे भारताला परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून राहावे लागणार नाही. भारताने सेमीकंडक्टर्स क्षेत्रात केलेली सुरुवात 'गेमचेंजर' मानली जाते. त्यामुळे भारत इतर देशांच्या (तैवान, चीन, अमेरिका) तुलनेत टेक्नॉलॉजी पॉवरहाऊस वा चिप हब होऊ शकतो. जगातील २० टक्के चिप डिझाईन इंजिनीयर्स भारतात कार्यरत आहेत. त्यांच्या कौशल्याला जागतिक स्तरावर वाव मिळेल. याचा परदेशी संबंधांवरदेखील सकारात्मक परिणाम होईल. भारत तांत्रिकदृष्ट्या प्रगत देश म्हणून ओळखला जाईल. त्यामुळे जगातील इतर देशांशी चांगले संबंध निर्माण होतील. ही चिप केवळ एक तांत्रिक उत्पादन नसून भारताच्या स्वातंत्र्य, सुरक्षा आणि आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहे. यामुळे भारत तांत्रिक महाशक्ती म्हणून जगासमोर उभा राहील. भारताने अलिकडेच दहा अब्जपेक्षा जास्त गुंतवणुकीसह आपला सेमी-कॉन इंडिया कार्यक्रम घोषित केला. हा कार्यक्रम सेमीकंडक्टर, डिस्प्ले उत्पादन आणि डिझाईन इकोसिस्टिममध्ये गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना आर्थिक साहाय्य प्रदान करेल.

'सेमिकॉन इंडिया' कार्यक्रमामुळे भारताची सेमीकंडक्टर यात्रा वेगाने पुढे सरकली आहे. सरकारने आधीच हाय-वॉल्युम फॅब्रिकेशन युनिट्स (फॅब्स), तीन हेटेरोजेनस पॅकेजिंग, कंपाऊंड सेमीकंडक्टर आणि आऊटसोर्स सेमीकंडक्टर असेम्बली ॲण्ड टेस्टिंग (ओसॅट) यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. याशिवाय, डिझाईन-केंद्रित उपक्रमांतर्गत २८० हून अधिक शैक्षणिक संस्थांना आणि ७२ स्टार्टअप्सना अत्याधुनिक टूल्सची मदत मिळाली आहे, तर डिझाईन लिंक्ड इन्सेन्टिव्ह योजनेखाली २३ स्टार्टअप्सना मंजुरी मिळाली आहे. सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये गेल्या ३० वर्षांमध्ये आपण बरीच प्रगती केली आहे आणि हजारो उद्योग तसेच लाखो रोजगार निर्माण केले. आता पुढील दशक इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर उद्योगाचे असेल. याचा व्यूहात्मक फायदा आयात कमी करून स्थानिक व्यवसाय आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीनेही होईल. या उद्योगांना शेकडोंच्या संख्येने अनेक प्रकारचे कौशल्यवान अभियंते लागतील. अनेक जागतिक चिप डिझाईन कंपन्यांची संशोधन आणि विकास केंद्रे भारतात आहेत. या संधीचा फायदा घेऊन भारत चिप डिझाईन आणि सॉफ्टवेअरच्या क्षेत्रात आपले स्थान अधिक मजबूत करू शकतो. भारतीय कंपन्या सेमीकंडक्टर फॅब्स उभारून फक्त उत्पादनच नाही तर चिप डिझाईनमध्येही आपली क्षमता वाढवू शकतात. या गुंतवणुकीमुळे भारतातील तरुणांना उच्च दर्जाचे रोजगार उपलब्ध होतील आणि देश तंत्रज्ञानाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

# भारत, बहुध्रुवीय जगात संतुलन साधणारी शक्ती


## प्रासंगिक

हिमांशु अनंतराव जोशी

जागतिक भूराजकारणाच्या बदलत्या वाळूत, एक वास्तव अधिकाधिक स्पष्ट होत आहे: भारत आता निष्क्रिय खेळाडू नाही तर २१ व्या शतकातील जागतिक व्यवस्थेला आकार देणारी एक मध्यवर्ती शक्ती आहे. रशिया-युक्रेन युद्ध, अमेरिका धोरणात्मक निवडी आणि चीनचा उदय या सर्वांनी भारताची महत्त्वाची 'संतुलन साधणारी शक्ती' म्हणून भूमिका अधोरेखित केली आहे.

### भारताचा अलिप्ततेचा वारसा

ऐतिहासिकदृष्ट्या, शीतयुद्धादरम्यान भारताने अलिप्ततेचे धोरण अवलंबले. आजच्या भाषेत सांगायचे तर, ते तत्त्व धोरणात्मक स्वायत्ततेमध्ये विकसित झाले आहे. नवी दिल्ली कोणाचाही कनिष्ठ भागीदार बनणार नाही - जिथे त्याचे स्वतःचे राष्ट्रीय हित सर्वोत्तम प्रकारे पूर्ण होईल तिथे ते कार्य करेल.



### आज आपण तेच पाहतो

- रशियाकडून परवडणारी ऊर्जा आणि संरक्षण पुरवठा खरेदी करणे.
- अमेरिका आणि युरोपसोबत उच्च-तंत्रज्ञान, संरक्षण आणि बाजारपेठ भागीदारी निर्माण करणे.
- सीमेवर खोलवर अविश्वास असूनही, चीन आणि ब्रिक्सशी सावधपणे संवाद साधत आहे.

बहुध्रुवीय जगात, एकतर्फी युती हा एक सापळा आहे हे भारत सिद्ध करत आहे. संतुलन ही शक्ती आहे.

**अमेरिका आणि त्याचा धोरणात्मक अंधविश्वास :** अमेरिकेने ऐतिहासिकदृष्ट्या स्वतःला लोकशाहीचा 'मोठा भाऊ' म्हणून स्थान दिले आहे. तरीही, अलिकडच्या वर्षांत, वॉशिंग्टनने अनेकदा संयुक्त राष्ट्रांसारख्या जागतिक संस्थांना मागे टाकले आहे, त्याऐवजी नाटो किंवा एकतर्फी युतींद्वारे कार्य करणे निवडले आहे. यामुळे जगातील बहुतेक भागात असंतोष निर्माण होतो - ते नेतृत्वासारखे कमी आणि नियंत्रणासारखे जास्त दिसते.

युक्रेनवर अमेरिकेचे लक्ष हे एक उदाहरण आहे. लोकशाहीला पाठिंबा म्हणून सादर केले जात असले तरी, ते व्यवसायाची स्पष्ट छाप देखील ठेवते: मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र विक्री, दुर्मिळ-खनिज तत्त्व अधिग्रहण आणि रशियाविरुद्ध भू-राजकीय फायदा. भारतासह जागतिक दक्षिणेतील बरेच लोक हे शांतता निर्माण म्हणून नव्हे तर व्यवहार राजकारण म्हणून पाहतात.

त्याहूनही वाईट म्हणजे, पाकिस्तानवरील वॉशिंग्टनचा ऐतिहासिक अवलंबित्व आणि भागीदारांवरील व्यवहारात्मक दृष्टिकोन यामुळे नवी दिल्लीत प्रश्न उपस्थित झाले आहेत. भारतासारख्या देशासाठी - १.४५ अब्ज लोकसंख्या असलेला, जगातील सर्वांत मोठी लोकशाही, २०३० पर्यंत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचणारी ४ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था आणि तरुण प्रतिभेचे एक महासत्ता - अस्थिर किंवा अतिरेकी राजवटींच्या बाजूने दुर्लक्षित करणे ही एक धोरणात्मक चूक दिसते.

भारताचा दृष्टिकोन सरळ आहे.

**सुरक्षा आणि ऊर्जा :** रशियाशी संबंध ठेवा.

**तंत्रज्ञान आणि बाजारपेठा :** अमेरिका आणि युरोपशी संबंध अधिक दृढ करा.

**भू-राजकीय आवाज :** ब्रिक्स मजबूत करा आणि जागतिक दक्षिणेचे नेतृत्व करा.

**चीन घटक :** आवश्यकतेनुसार आर्थिकदृष्ट्या सहभागी व्हा, परंतु धोरणात्मक सावधगिरी बाळगा.

ही संतुलित कृती गोंधळ नाही - ही रणनीती आहे. भारत सर्व पर्याय खुले ठेवून फायदा निर्माण करत आहे.

**बहुध्रुवीय भविष्य :** जग आता एकध्रुवीय राहिलेले नाही, अमेरिकेचे वर्चस्व क्षीण होत आहे. तसेच ते अमेरिका आणि चीनमध्ये व्यवस्थित द्विध्रुवीय होणार नाही. त्याऐवजी, आपण खऱ्या अर्थाने बहुध्रुवीय युगात प्रवेश करत आहोत, ज्यामध्ये अनेक शक्तिकेंद्रे असतील.

अमेरिका आणि युरोप, चीन आणि रशिया, भारत, ब्रिक्स+ आणि प्रादेशिक युतीसारखे उदयोन्मुख ध्रुव.

जर भारताने काळजीपूर्वक संतुलन राखले तर ते केवळ एक स्विंग स्टेट राहणार नाही - ते स्वतःच्या अधिकारात एक स्वतंत्र सत्तेचा ध्रुव म्हणून उदयास येईल.

**मोठा धडा :** जर अमेरिकेने अदूरदर्शी, व्यवहारात्मक धोरणे सुरू ठेवली तर तो भारतातील एक नैसर्गिक मित्र गमावण्याचा धोका पत्करतो. भारतासाठी, धडा तितकाच स्पष्ट आहे: आजच्या बहुध्रुवीय जगात, एका बाजूला जास्त झुकणे त्याच्या हिताचे नाही. संतुलन हाच एकमेव शाश्वत मार्ग आहे.

९३२५५७७७३३

## रविवारची पत्रे

### पितृपक्षातील मस्कऱ्या गणेशोत्सव ऐतिहासिक

पितृपक्षामध्ये धार्मिक कार्यक्रमासह पारिवारिक कार्यक्रम किंवा शुभकार्य करणे टाळले जाते. परंतु पितृपक्षाच्या काळातही प्रामुख्याने विदर्भात २७० वर्षांपासून हाडपक्या (मस्कऱ्या) गणपती उत्सव साजरा करण्यात येतो. यामागे सुद्धा ऐतिहासिक परंपरा व संस्कृती आहे. नागपुरातील प्राचीन परंपरेतील ऐतिहासिक उत्सव म्हणजे हाडपक्या गणपती. हा उत्सव गणेशोत्सव



संपल्यानंतर सुरू होतो. नागपूरसह विदर्भातील अनेक जिल्ह्यांत हाडपक्या गणपती उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. हा गणपती उत्सव घरगुती स्वरूपाचा नसून सार्वजनिक स्वरूपाचा असतो. पूर्वी मोठ्या प्रमाणात सार्वजानिकरीत्या हा उत्सव साजरा होत असे. परंतु कालांतराने आता काही मोजक्याच ठिकाणी हा उत्सव साजरा केला जातो. विदर्भात पितृपक्षाला 'हाडपक' असेही म्हणतात. म्हणून हाडपकात बसविलेल्या गणपतीला हाडपक्या गणपती असेही संबोधले जाते.

राजे भोसले यांचे नागपुरात आगमन झाल्यानंतर अनेक प्रथा व परंपरांची सुरुवात झाली. घरगुती गणेश विसर्जन झाल्यानंतर जी पितृपक्षातील चतुर्थी येते त्या कृष्णपक्ष संकष्ट चतुर्थीला हाडपक्या गणपतीची स्थापना केली जाते. इ. स. १७५५ मध्ये नागपुरातील भोसले घराण्यातील तत्कालीन राजे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले ऊर्फ चिमणाबापू हे बंगालच्या स्वारीवर होते. बंगालवर ऐतिहासिक विजय मिळवून परत येत असताना कुळाचारी गणपतीचे विसर्जन झाले होते. त्यामुळे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले गणपती उत्सव साजरा करू शकले नाहीत. त्यावेळी राजपुरोहित व अन्य विद्वानांसोबत चर्चा करून पितृपक्षातील भाद्रपद कृष्ण चतुर्थी (भाद्रपद संकष्ट चतुर्थी) ला गणपती उत्सव साजरा करण्याचे ठरविले आणि त्यासोबत बंगालवर ऐतिहासिक विजय मिळविण्याच्या आनंदोत्सव सुद्धा सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले. तेव्हापासून हाडपक्या गणपतीला सुरुवात झाली आहे.

या काळात लावण्या, नकला, भारूड, खडीगंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत असे. यावेळी अनेक गमतीजमतीचे कार्यक्रम होत असत. त्यात थट्टामस्करी, नाटक, खडी गंमत इत्यादींचा भडिमार होत असे. म्हणजेच कार्यक्रमाच्या माध्यमातून मस्करी व्हायची यातूनच 'मस्कऱ्या' हे स्थानिक बोलीभाषेतील नाव प्रचलित झाले आणि पितृपक्षातील गणपतीला मस्कऱ्या गणपती नावाने प्रसिद्धी मिळाल्याचे सांगितले जाते. हाडपक्या गणपती उत्सवाचा मुख्य सोहळा नागपुरातील भोसले राजवाडा, महाल येथे आयोजित करण्यात येतो. या उत्सवाला आज २७० वर्षे पूर्ण होत आहेत म्हणजेच ही ऐतिहासिक परंपरा आहे. श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले यांच्या काळात हाडपक्या गणपतीची स्थापन केली जात होती. तीच परंपरा आजही आपल्याला पाहायला मिळते. त्याच प्रकारची मूर्ती स्थापन करण्यात येते. त्याकाळी लावण्या, भारूड, पोवाडे, खडी गंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जायचे. परंतु आता कालांतराने वेगवेगळे मनोरंजनात्मक कार्यक्रम आले. हा उत्सव सलग दहा दिवस साजरा करण्यात येतो. या दरम्यान महाप्रसादचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो व भाद्रपद कृष्ण द्वादशीला गणपती उत्सवाची सांगता होते. यामुळे लक्षात येते की भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सण व उत्सवाला अत्यंत महत्त्व असते. मग तो कोणत्याही धर्माचा उत्सव असो. यातूनच आपली जडणघडण व विविधता दिसून येते.

**रमेश लांजेवार**/९९२१६९०७७९

●● ●●

### नेपाळचा आगडोंब

आपला सख्खा शेजारी नेपाळ. एरवी अतिशय शांत असलेला नेपाळ अचानक असा आक्रमक का झाला? मागील काही दिवसांपासून नेपाळच्या काठमांडूमध्ये भयंकर क्रांतिसदृश आंदोलन सुरू आहे आणि या आंदोलनात अतिशय तरुण म्हणजे शाळा, कॉलेजातील विद्यार्थी, तरुण वर्ग आहे. असे काय घडले की या तरुण वर्गाला रस्त्यावर उतरून एवढे हिंसक आंदोलन करावेसे वाटले. निमित्त होते सोशल मीडियावर बंदीचे. या सोशल मीडियाने आपले संपूर्ण जग व्यापले आहे. आपली सकाळ फेसबुक, व्हॉट्सॲप आणि इन्स्टाग्रामने सुरू होते. आणि याच समाज माध्यमांवर नेपाळ सरकारने पूर्ण बंदी आणली.

आजपर्यंत नेपाळमध्ये १७ वर्षात १५ सरकारे बदलली. त्यामुळे सतत अनिश्चितता, अस्थिरता तिथे होती. राजेशाही गेल्यानंतर लोकशाही आली. आता तरी नेपाळचा विकास होईल, रोजगार मिळतील अशी आशा तिथल्या लोकांना, तरुणांना होती. पण सततचे सत्तांतर आणि प्रचंड भ्रष्टाचार यामुळे विकास आणि रोजगाराचे स्वप्न स्वप्नच राहिले. गेल्या कित्येक वर्षांत तेथील जनता, तरुण वर्ग आतल्या आत धुमसत होता. त्याला विस्तव लावण्याचे काम समाज माध्यमांवर बंदी आणून नेपाळ सरकारने केले. आणि एकच भडका उडाला. तरुणांच्या हाताला काम नसेल तर डोक्यात आग भडकणारच. एकदा आंदोलनाने हिंसक वळण घेतले की सगळ्यांचीच सद्सदविवेकबुद्धी नष्ट होते. त्याचाच परिणाम म्हणजे संसद, राष्ट्रपती आवास, पंतप्रधान आवास, पीएमओ कार्यालय यांची जाळपोळ करण्यात झाला. अगदी सुप्रीम कोर्टाचा सुद्धा ताबा घेतला. आपण आपल्याच देशाची संपत्ती नष्ट करत आहोत याचे भान त्यावेळी कोणालाच राहत नाही. शेवटी सत्ता उलथवूनच ही आग थांबली म्हणण्यापेक्षा कमी झाली. तिथल्या सत्ताधाऱ्यांचा भ्रष्टाचार, घराणेशाही, त्यांची चैनीवृत्ती यांना नेपाळी जनता कंटाळली होती. त्याचीच परिणती अशी झाली. भारताच्या भोवताल अनेक लहान देश आहेत आणि आधी ते आपले चांगले मित्रही होते. पण हळूहळू ते चीनच्या कह्यात जाऊ लागले. पूर्वी नेपाळ हे जगातील एकमेव हिंदू राष्ट्र होते. गेल्या काही वर्षात श्रीलंका, म्यानमार, बांगलादेश या ठिकाणी अशीच आंदोलने, उठाव झालेत. त्याची कारणे वेगवेगळी असली तरी जनतेत असंतोष सारखाच होता आणि आता नेपाळ. यातून आपण धडा घेतला पाहिजे. तरुण वर्गाला गृहीत धरता कामा नये. कोणत्याही सत्ताधाऱ्यांनी जनतेच्या संयमाची परीक्षा पाहू नये एवढेच वाटते .

**माधवी पत्की**/नागपूर

●● ●●

### प्रत्येक देशाला हवेत एक मोदी

चांगल्या कामात विघ्न घालणारे असतातच. चांगल्या लोकांना विरोधक असतातच. परंतु चांगल्या कामाचे कधीतरी कौतुक असेल तर त्याला योग्य विरोधक म्हणू. भारतामध्ये मोदी विरोधकांची काही कमतरता नाही. किंबहुना एकातून दोन असे छोटे छोटे तयारच होत असतात. मोदी अशांची मुळीच कदर करत नाही. प्रत्येक गोष्टीला मोदींनीच उत्तर द्यावे तर मग मंत्रिमंडळाची स्थापना कशाला? विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे तर केवळ नॅरेटिव्ह मांडण्यात गुंतले असतात. खोटे मत घेऊन मोदींचा पक्ष जिंकला असे म्हणत असताना त्याच निवडणुकीत काँग्रेस पक्षाला नव्वदच्या वर जागा मिळाल्या. त्या कशा मिळाल्या? याचे उत्तर ना गांधी परिवार देऊ शकत ना मल्लिकार्जुन खडगे.

आपल्या आजूबाजूच्या देशात सध्या अराजकता माजली आहे. बांगलादेशात अंतर्गत कलहामुळे बंड झाले. श्रीलंकाही त्याच मार्गाने गेला व आता नेपाळ सुद्धा अशाच कलहाला बळी पडला आहे. केवळ अयोग्य नेत्यांनी जागा वर्षानुवर्ष पकडून ठेवल्या व आपल्या देशाचा विकास सुद्धा केला नाही. त्यामुळे जनता चिडली आणि उद्रेक झाला. या सर्व ठिकाणी युवकांनी हे बंड पुकारले आहे हे महत्त्वाचे. आणि त्याच युवकांना आपल्या देशाचे नेतृत्व मोदींसारख्या नेत्यांनी करावे असे वाटते. प्रत्येक देशाला एक मोदी हवे आहेत. आपला परंपरागत शत्रू पाकिस्तानची जनता सुद्धा याच मताची आहे. ती सुद्धा आपल्या देशातील राजकारणाला कंटाळली आहे. तिथे पण असा उद्रेक बलुचिस्तानकडून केव्हाही होऊ शकतो. भारतात काही जन्मजात विरोधी नेते असा उद्रेक होईल असे म्हणत आहे. अशा लोकांची कीव वाटते व जेथे एक शक्तिशाली नेतृत्व आहे तेथे असा उद्रेक होणे कसे शक्य आहे? आपल्या देशाची प्रतिमा विरोधी पक्षच धुळीस मिळवत आहे. पण हे सर्व करताना आपलाच पक्ष संपल्यात जमा होत आहे हे काँग्रेससह इतर विरोधी पक्षांना अजूनही कळत नाही हे दुर्दैव आहे. खंबीर नेतृत्वात भारत जगातील महासत्ता निश्चित बनणार. मग विरोधकांची कोल्हेकुई कितीही वाढो.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

●● ●●

### न्यायाची अपेक्षा कोणाकडून करणार?

ज्यांच्याकडून आपल्याला न्यायाची अपेक्षा असते, नव्हे, ज्यांनी न्याय द्यावा अशी जबाबदारी असते ते गेंड्याच्या कातडीचे झाले असल्यामुळे अनेक निष्पाप जीवांना अकाली मृत्यूला कवटाळावे लागते, जसे ओडिशातील त्या वीस वर्षांच्या मुलीने केले. बालासोर येथील कॉलेजमध्ये ती बीएडचे शिक्षण घेत होती. तेथील विभागप्रमुख तिचा छळ करत होता. प्राचार्यांकडे तिने याबाबत तक्रार केली होती. आता अशीही माहिती समोर आली आहे की स्वतःला पेटवून घेण्याचे टोकाचे पाऊल उचलण्याच्या काही दिवस अगोदर तिने सोशल मीडियासमोर एक पोस्ट टाकली होती. ही पोस्ट म्हणजे तिने केलेली सार्वजनिक तक्रार होती. दोषींवर कारवाई केली नाही आणि आपल्याला न्याय मिळाला नाही तर आपण जीव देऊ, असे तिने स्पष्ट म्हटले होते. कॉलेजच्या अंतर्गत समितीपासून प्राचार्यापर्यंत ज्या ज्या ठिकाणाहून न्याय मिळण्याची अपेक्षा केली जाऊ शकते त्या सर्व ठिकाणी ती गेली. कोणीच तिला दाद दिली नाही. उलट तिने विभागप्रमुखाच्या विरोधातील आरोप मागे घ्यावेत यासाठी प्राचार्यांनीच तिच्यावर दबाव आणल्याचा आरोप आहे. ज्या शिक्षकांकडून ज्ञानाची अपेक्षा केली जाते त्यांनीच आपल्या विकृत लालसेपोटी छळ करावा आणि समोरच्याने आयुष्यच संपवावे हे कुठल्या जगात बसते. अचानक कोणता गुन्हा घडला तर त्यात युक्तिवादाला अथवा स्पष्टीकरणाला वाव असतो. तथापि गुन्हा होत असतानाही प्रतिष्ठेच्या नावाखाली असले प्रकार झाकण्याचा प्रयत्न होत असेल तर आरोपीपेक्षाही त्याचा बचाव करणारे अधिक दोषी ठरतात.

महाराष्ट्रातील बदलापूर येथील चिमुरड्यांचे प्रकरणही याच प्रकारातले होते. याबाबतही बरीच चर्चा, माध्यमे आणि समाजमाध्यमात झाली. मात्र घटना नक्की कशामुळे घडली यावर प्रकाश पडलाच नाही. यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रत्येक शैक्षणिक संस्थेत लैंगिक छळाच्या तक्रारींच्या चौकशीसाठी समिती असली पाहिजे. तशी ती असते किंवा असली तरी त्यासोबत संवेदनशीलताही असली पाहिजे. जर ती नसेल तर मुलगा किंवा मुलगी बीएड, बी. टेक. शिकणारी किंवा डॉक्टर झालेली, कोलकात्यातील किंवा बालासोर येथील त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची आणि त्यांना सामना करावा लागत असलेल्या मानसिक त्रासाची जाणीवच होणार नाही. विद्यार्थ्यांशी नियमितपणे संवाद साधला गेलाच पाहिजे आणि मुलींच्या संदर्भात तर विशेष जागरूकता असली पाहिजे. तक्रार आल्यावरच काही बाबी उघड होतात हे खरे आहे. मात्र तक्रार येऊनही दखल घेतली जात नसेल तर न्यायाची अपेक्षा कोणाकडून करणार हा प्रश्न मात्र अनुत्तरितच आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

●● ●●

## गुरुवचन युगप्रवर्तक राष्ट्रसंतांचे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवनचरित्र मानवतावादी संस्कारांनी ओतप्रोत भरलेले आहे. त्यांच्या ठायी विद्यमान स्वभाव गुण, देशप्रेम, समता, ममता, त्याग, शांती आणि सहृदयता आशीर्वाद रूपाने आम्हास प्राप्त होवो अशीच सदिच्छा व्यक्त करत या मानवतेच्या दिव्य ज्योतीला दीपस्तंभाला शतशत नमन.

अमरावती जिल्ह्यातील यावली ही वंदनीय राष्ट्रसंतांची जन्मभूमी. पिता बंडोजी इंगळे (ठाकूर ) व माता मंजुळादेवी यांचे सुपुत्र माणिक. समर्थ आडकोजी महाराजांनी त्यांना तुकड्या म्हणून संबोधिले. ''एकांती ध्यान लोकांती भजन'' हा व्यासंग असणारे तुकडोजी महाराज ग्रामगीतेत गुरु- शिष्यांचे संस्कार कसे असावे यावर आपल्या साध्या व सहज शैलीतून प्रकाश टाकतात. या प्रकाश किरणांचे तेज आजही शिक्षक विद्यार्थ्यांना तेजोमय करीत आहे. आमच्या व्यक्तिमत्त्वाला संस्काररूपी पैलू पाडून आम्हास कीर्तिवंत, ज्ञानवंत आणि संस्कारक्षम बनवण्याचा आशीर्वाद देत आहेत. ग्रामविकासातूनच राष्ट्र विकास होईल हे ग्रामगीतेतून तुकडोजी महाराज आपल्यासमोर ठेवतात. आजच्या पिढीचा विद्यार्थी हातात मोबाईल घेऊन आहे. तो मोबाईल सोडून त्याने जर ग्रामगीता हातात घेतली तर त्याच्या वर्तनात सकारात्मक बदल आपल्याला नक्कीच दिसून येईल.



ग्रामगीतेतील दुसरा अध्याय धर्माध्ययन -''तुझं नाही दिले का संस्कार! घडावया सद्गुणी व्यवहार!

काय करिती पालक चतुर?

लक्ष नाही तुझ्यावरी!!''

संस्कारक्षम जीवनाची मुहूर्तमेढ ही घरातून होत असते. चांगल्या संस्कारातूनच बालकांचे व्यवहार सद्गुणी होतात. जे पालक सदा सर्वदा स्वतःच्या वागण्या-बोलण्यातून, आपल्या दिनचर्येतून आपल्या पाल्यांना घडवितात तेच खरे हुशार पालक असतात. पालकांसाठी राष्ट्रसंतांचा सल्ला आहे की त्यांनी आपल्या पाल्यांना सकाळी लवकर उठवावे, सुखी व स्वस्थ आरोग्यासाठी व्यायाम करावयास सांगावे, त्यांच्याशी संवाद साधताना त्यांच्यासमोर महापुरुषांचे आदर्श प्रस्थापित करावेत.

''कराया लावावे प्रातध्यान! सायंकाळी प्रार्थना पूर्ण !

झोपता जागता चिंतन! आदर्श महापुरुषांचे!!''

त्यांच्या अभ्यासाची काळजी पालकांनी करावी. त्यांच्या आहाराकडे विशेष लक्ष द्यावे. आंबट, तिखट, मसालेदार पदार्थ त्यांच्या आहारात नसावे . ब्रह्मचर्य आश्रमात म्हणजेच विद्यार्थिदशेत असताना विद्यार्थ्यांनी सात्त्विक आहार ग्रहण केला पाहिजे. यासाठी राष्ट्रसंत म्हणतात..

''मुलगा अभ्यासाला लागला!

की सात्त्विक खाणे असावे त्याला!

खारट आंबट तिखट मसाला! देऊ नये भोजनी!!''

विद्यार्थी हे चार भिंतीत म्हणजेच वर्ग खोल्यांमध्ये जेवढे शिकतात त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक ते अनुकरणातून शिकतात. आई-वडिलांचे अनुकरण तर ते करतातच पण त्याचबरोबर मोठी जबाबदारी असते ती शिक्षकांची. विद्यार्थी शिक्षकांचे अनुकरण वेळोवेळी करतात. राष्ट्र उन्नतीसाठी ज्ञानदानाचा अविरत यज्ञ तेवत ठेवणाऱ्या शिक्षकांचे उठणे, बसणे , शिकविणे, बोलणे, वागणे याचे बारीक निरीक्षण विद्यार्थी वेळोवेळी करत असतात. शिक्षकांच्या आचार विचारांची मोठी छाप विद्यार्थ्यांवर पडत असते.

आज पालक व शिक्षक यांच्याकडून विद्यार्थ्यांना जीवन शिक्षण मिळाले पाहिजे. प्रत्येक जण उद्योगी असला, त्याच्याकडे कलाकुसरी असेल तर जराही बेकारी राहणार नाही. सहकार्य, सहानुभूती, समाजसेवा, समता, बंधुता इत्यादी गुणांचा विकास होत गेला की समृद्ध ग्राम, विकसित समाज आणि प्रगतिपथावर असणाऱ्या राष्ट्राचे स्वप्न पूर्ण करता येईल असे गुरु वचन राष्ट्रसंतांनी आपल्या विद्यार्थ्यांना व आपल्या शिक्षकांना ग्रामगीतेतून दिलेले आहे.

**संगीता बघेले**/८८८८३६६३७५

### पाकिस्तानसोबतच्या संबंधांचे चक्र थांबवायलाच हवे!

भारतात दहशतवादाचा प्रश्न नवा नाही. गेली अनेक दशके सीमापार होणाऱ्या हल्ल्यांनी शेकडो कुटुंबे उद्ध्वस्त केली. कधी मुंबईचे बॉम्बस्फोट, कधी संसद हल्ला, कधी २६/११, कधी पुलवामा. दरवेळी रक्ताने भिजणारे हे प्रसंग भारतीय जनतेच्या मनावर खोल जखमा करून गेले आहेत. प्रत्येक वेळी सरकारकडून कठोर पावले उचलली जातील, पाकिस्तानशी सर्व संबंध तोडले जातील अशी अपेक्षा केली जाते. पण वास्तव वेगळेच दिसते.

ज्या क्षणी मोठा दहशतवादी हल्ला होतो, त्याक्षणी सरकार आणि विरोधक दोन्ही बाजूंनी तीव्र देशभक्तिपर सूर लावले जातात. पाकिस्तानविरोधी वक्तव्ये, सीमा बंद, क्रिकेट, सांस्कृतिक देवाणघेवाण थांबवली जाते. जनतेत राग उसळतो, पीडितांच्या घरात शोककळा पसरते. त्या क्षणी संपूर्ण देश एकदिलाने पाकिस्तानविरोधात उभा राहतो.

परंतु काही महिने जातात तसे वातावरण सैल होऊ लागते. राजकारणात नवीन मुद्दे पुढे येतात. मग हळूहळू कलाकारांच्या चित्रपटांना परवानगी दिली जाते, व्यापार पुन्हा सुरू होतो, क्रिकेटच्या मैदानावर भारत-पाकिस्तान सामना खेळवला जातो. 'हे खेळ आहे, यात राजकारण आणू नका' असा सूर लावला जातो. पण ज्यांनी आपले वडील, पती किंवा मुलं गमावले आहेत, त्यांना या दुटप्पी भूमिकेचा प्रचंड संताप येतो.

इतिहास साक्ष आहे. मोठा हल्ला झाला की पुन्हा सर्व बंद, पुन्हा घोषणाबाजी, पुन्हा देशभक्तीची लाट. काही काळाने तेवढेच सगळे परत सुरू. हा खेळ गेल्या कित्येक दशकांपासून चालू आहे. ज्यांच्या घरातले लोक गेले, त्यांना मात्र सरकारच्या या चक्राचा काही उपयोग नाही. त्यांची अपेक्षा एकच. देशाने ठामपणे पाकिस्तानसोबतचे सर्वच प्रकारचे संबंध तोडावेत. ना क्रिकेट, ना व्यापार, ना कलाकारांची देवाणघेवाण. कारण दहशतवादाच्या सावलीत राहून 'मैत्री' करणे ही पीडितांवरची दुसरी जखम ठरते.

पाकिस्तानविरोधी घोषणांवर निवडणुकीचे राजकारण झाले, देशभक्तीच्या भावना पेटवून राजकीय फायद्याची समीकरणे जुळवली गेली. पण प्रत्यक्ष कृतीत सातत्य नाही. एकीकडे कडक कारवाईच्या घोषणा आणि दुसरीकडे पुन्हा व्यापार-क्रिकेट-कलाकारांचे स्वागत हा दुटप्पीपणा संपवण्याची वेळ आली आहे. आता भारताने ठाम भूमिका घ्यायला हवी. पाकिस्तान जोपर्यंत दहशतवादाला आश्रय देतो, तोपर्यंत त्यांच्याशी कोणतेही क्रीडा, सांस्कृतिक किंवा व्यापारी संबंध ठेवायचेच नाहीत. अल्पकालीन फायद्यापेक्षा दीर्घकालीन सुरक्षिततेला प्राधान्य द्यायला हवे. हे पाऊल कठीण आहे, पण देशाच्या हुतात्म्यांचे बलिदान व्यर्थ जाऊ नये यासाठी ते आवश्यक आहे.

**अनिरुद्ध निमखेडकर**/९९७०८३५७२४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com

तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## दयानंद विज्ञानमध्ये उद्योजकांसाठी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१४ सप्टेंबर -**



दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या औद्योगिक रसायनशास्त्र व रसायनशास्त्र विभागातर्फे दि. ११ सप्टेंबर रोजी प्रारंभिक टप्प्यातील उद्योजकांसाठी उदयोन्मुख संधी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा झाली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे होते. उद्योग तज्ज्ञ राम नाथ पाटील यांनी प्रमुख मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी संशोधन व कौशल्य विकासावर भर द्यावा, उद्योजकतेसाठी संधींचा योग्य उपयोग करावा असे सांगितले.

प्रास्ताविक डॉ. युवराज सारणीकर यांनी केले, तर आभार प्रा. राहुल जाधव यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. निर्मला चिवडशेट्टी यांनी केले. या वेळी प्राध्यापक, कर्मचारी व बी.एस्सी. तसेच एम.एस्सी. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



#### सहकार मंत्र्यांकडून सावता माळी कुटुंबियांचे सांत्वन

**चाकूर, दि.१४ सप्टेंबर -**
चाकूर तालुक्यातील आष्टा गावचे सरपंच सावता माळी यांच्या नातवाचे काही दिवसापूर्वी अपघाती निधन झाले होते. आज सहकारमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी सावता माळी यांच्या आष्टा येथील निवासस्थानी माळी कुटुंबियांची सांत्वनपर भेट देऊन माळी कुटुंबीयाला धीर दिला. यावेळी त्यांच्यासमवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मकरंद सावे, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस बबन भोसले, भानुदास पोटे, अनिल वाडकर, शेषेराव मुंजाने, यादव करडीले, सचिन तोरे सह आदी उपस्थित होते.



#### लालबहादूर शास्त्री विद्यालयात आ. संजय बनसोडे यांचा सत्कार

**उदगीर, दि.१४ सप्टेंबर -**
येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्र राज्याचे माजी युवक कल्याण व क्रीडा मंत्री आ. संजय बनसोडे यांचा लालबहादूर शास्त्री शैक्षणिक संकुलाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, कार्यवाह शंकरराव लासूणे, राहुल केंद्रे, डॉ. प्रकाश येरमे, रूक्मन पेन्सलवार, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट यांसह शिक्षक उपस्थित होते.

# पाऊस धाराशिव जिल्ह्यात; तर पुर लातूर जिल्ह्यात!

**तेरणेचा पूल पाण्याखाली... नदीकाठची पिके जलमय... किनीथोट मंडळात दुसऱ्यांदा अतिवृष्टी...**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१४ सप्टेंबर -**
शनिवारी रात्री धाराशिव जिल्ह्यात पावसाचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी लातूर जिल्ह्यातील तेरणा नदीला महापुर आला. उजनी येथे पुराचे पाणी बाजार चौकात घुसले तर राष्ट्रीय महामार्गावरील तेरणेचा पूल पाण्याखाली गेला होता. मात्र सायंकाळपर्यंत वाहतूक सुरू होती.



पुरामुळे नदीकाठच्या शेतजमिनीतील उभी पिके पाण्यात गेल्याने मोठे नुकसान होण्याची भीती आहे.

किनीथोट मंडळात ६९.५ मिमी पावसाची नोंद झाली असून ऑगस्टनंतर सप्टेंबरमध्ये दुसऱ्यांदा अतिवृष्टी झाली आहे. हवामान खात्याने १३ ते १८ सप्टेंबर या कालावधीत लातूर व धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा दिला होता. त्यानुसार शनिवारी धाराशिव जिल्ह्यात जोरदार पाऊस झाला, मात्र लातूर जिल्ह्यात पावसाचे प्रमाण तुलनेने कमी होते.

**औसा तालुक्यात पावसाची नोंद**
**औसा मंडळ : ५०.८ मिमी, लामजना : १५ मिमी, मातोळा : ५.५ मिमी, भादा : ४२.८ मिमी, किल्लारी : १४.३ मिमी, किनीथोट : ६९.५ मिमी**

औसा व किनीथोट मंडळ वगळता इतर मंडळात पुरेसा पाऊस झाला नाही.

मात्र तेरखेडाच्या डोंगरातून उगम पावणाऱ्या तेरणा नदीला महापुर आल्याने उजनीसह नदीकाठच्या गावांमध्ये चर्चा सुरू आहे.

रात्रीपासून पाण्याची पातळी सतत वाढत असून दुपारपर्यंत नदीकाठचा परिसर पुराच्या पाण्याने वेढला होता.

नदीकाठच्या पिकांवर पाणी साचल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे.

## जात प्रमाणपत्र न मिळाल्याने दादगीतील एकाची आत्महत्या

**नातेवाईक व कोळी समाजाचा सहा तास ठिय्या आंदोलन... शासनावर तातडीच्या मागण्या...**



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१४ सप्टेंबर -**
मुलांच्या शिक्षणासाठी महादेव कोळी जातीचे प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे निलंगा तालुक्यातील दादगी येथील शिवाजी वाल्मीक मेळ्ळे (वय ३२) यांनी शनिवारी रात्री सात वाजता विजेच्या तारेला स्पर्श करून आत्महत्या केली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून शासनव्यवस्थेतील विलंबामुळे एका पित्याला आपले जीवन संपवावे लागले, याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

घटनेनंतर रविवारी दि.१४ सप्टेंबर रोजी मयताच्या नातेवाईकांनी व कोळी समाजबांधवांनी उपजिल्हा रुग्णालयात तब्बल सहा तास ठिय्या आंदोलन केले.

जात प्रमाणपत्र आणि वैधता सुलभतेने द्या, मयताच्या वारसांना आर्थिक मदत द्या आणि संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करा, या मुख्य मागण्यांसह शेकडो महिला-पुरुष उपस्थित होते.

आंदोलनावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल ढूमे-पाटील, सहायक पोलिस निरीक्षक हनुमंत बांगर, तसेच सीआरपीएफसह मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यानंतर लातूरचे अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी आंदोलनस्थळी दाखल होऊन मागण्यांचे निवेदन स्वीकारले.

शासनस्तरावर मागण्यांचा पाठपुरावा होईल व संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईल, असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी प्रेत ताब्यात घेतले.

## चाकूर तालुक्यात दोन दिवसांत दोन मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१४ सप्टेंबर -**
चाकूर तालुक्यातील भाटसांगवी येथील शेतकरी बळीराम पांडुरंग टमके (६५) यांचा शेतामध्येच विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. विशेष म्हणजे, या घटनेच्या दुसऱ्याच दिवशी हणमंतवाडी येथील अनिल राठोड (२८) यांचा देखील विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला आहे. सलग दोन दिवसांत दोन मृत्यू झाल्याने महावितरणच्या निष्काळजी कारभारावर नागरिकांतून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

१२ सप्टेंबर रोजी सकाळी बळीराम टमके हे शेतात जनावरे चारत असताना विजेच्या तारेच्या संपर्कात आले व जागीच मृत्यूमुखी पडले. बराच वेळ घरी न आल्याने त्यांचा भाऊ तातेराव टमके व मुलगा शेतात गेले असता ही दुर्घटना उघडकीस आली. त्यांच्या पश्चात आई, तीन भावंडे, पत्नी, एक मुलगा व तीन मुली असा परिवार आहे.

दरम्यान, १४ सप्टेंबर रोजी हणमंतवाडी येथील तरुण अनिल बळीराम राठोड (२८) यांचाही विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. सलग दोन दिवसांत घडलेल्या या दुर्घटनांमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, प्रशासनाने याची तात्काळ दखल घेऊन महावितरणवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## गाईला प्रसूतीत मदत करून राम जायभाये ठरले 'प्राणीमित्र'

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१४ सप्टेंबर -**
शहरातील सानवी मंगल कार्यालयासमोर गाईने वासराला जन्म दिल्याची हृदयस्पर्शी घटना नुकतीच घडली. या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते राम जायभाये यांनी प्रसूतीत मदत करून गाईला आणि वासराला मायेने सुश्रुषा केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दि.१४ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजून पंधरा मिनिटांच्या सुमारास प्रसूती वेदनांनी व्याकूळ झालेल्या गाईकडे पाहून अनेक जण थबकले होते. मात्र काय करावे, हे कुणालाच सुचत नसताना जायभाये यांनी पुढाकार घेत गाईला सुरक्षित जागा दिली आणि प्रसवक्रियेत मदत केली. काही प्रयत्नांनंतर गाईने एका गोंडस वासराला जन्म दिला. हा क्षण पाहून उपस्थित नागरिक भारावून गेले. जन्मानंतर जायभाये यांनी वासराला स्वच्छ करून गाईची काळजी घेतली. स्वतःच्या हातांनी तिला पाणी पाजले आणि वासराला तिच्या जवळ ठेवले. स्थानिक नागरिकांनीही त्यांना मदतीचा हात दिला.

या घटनेची माहिती शहरभर पसरताच जायभाये यांचे कौतुक सुरू झाले. माणुसकी अजूनही जिवंत आहे हे त्यांच्या कृतीतून पुन्हा सिद्ध झाल्याचे नागरिकांनी सांगितले.

## पानगावचे जोशी कुटुंब ठरले 'वतन के रखवाले'

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.१४ सप्टेंबर-**



वतनाची घरजागा अंगणवाडीसाठी दान, ग्रा.पं.कडून सत्कार

पानगाव येथील दानशूर माता लक्ष्मीबाई रमाकांत जोशी यांनी आपल्या वडिलोपार्जित परंपरागत घरजागेचे सुमारे १८०० चौ. फु. क्षेत्रफळ ग्रामपंचायतीला अंगणवाडी बांधकामासाठी विनाअट दान दिले आहे. परिसरातील लहान बालकांच्या शिक्षणासाठी केलेल्या या दानामुळे जोशी कुटुंबियांच्या दातृत्वाची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

आपल्या मातोश्रींच्या संकल्पपूर्तीसाठी त्यांचे सुपुत्र बाळकृष्ण रमाकांत जोशी, महेश रमाकांत जोशी व स्नुषा रेवती रेणुकादास जोशी यांनी विना अट, विना तक्रार संमतीपत्र देऊन हे दान अधिकृत केले. त्यामुळे अंगणवाडी क्रमांक पाचला आता स्वतंत्र जागा व इमारत उपलब्ध होणार आहे.

या कार्यासाठी कायदेशीर प्रक्रिया माजी सरपंच सुकेश भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आली. यानिमित्त ग्रामपंचायतीतर्फे जोशी कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला. या वेळी वसुली अधिकारी गोपीनाथ टकले, ग्रामपंचायत सदस्य गोविंद नरारे, रामभाऊ भंडारे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## शिरूर अनंतपाळ तालुक्यात मुसळधार पावसाचा तडाखा

**जोगाळा-हणमंतवाडी रस्त्यावरचा घरणी नदीवरील पूल वाहून गेला; शेतकऱ्यांचे हाल**

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१४ सप्टेंबर -**
शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मुसळधार पावसामुळे नदी-नाल्यांना आलेल्या मोठ्या पुरात जोगाळा-हणमंतवाडी रस्त्यावरील घरणी नदीवरील पूल वाहून गेला आहे. त्यामुळे जोगाळा येथील शेतकऱ्यांना आपल्या शेतजमिनीकडे जाणे अशक्य झाले असून, नागरिकांनी या पुलाची तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.



या रस्त्याला ऐतिहासिक महत्त्व असून, तो निजामकालीन मानला जातो. परिसरात मोठ्या प्रमाणावर शेती, फळबागा आणि शेतीपूरक व्यवसाय आहेत. पुल वाहून गेल्याने सिमेंट पाईप उघडे पडले असून ये-जा करणे धोकादायक व कठीण झाले आहे. त्यामुळे दैनंदिन कामांसाठी तसेच शेतीकामासाठी शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शेतकरी व नागरिकांचा सवाल आहे की, या भागातील महत्त्वाचा पूल वाहून गेल्यावर प्रशासन किंवा लोकप्रतिनिधी लक्ष देतील का? त्यांनी प्रशासनाकडे तातडीने पुलाची दुरुस्ती करून शेतकऱ्यांची गैरसोय दूर करण्याची मागणी केली आहे.

## तगरखेडा बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी तब्बल १ कोटी ७९ लाखांचा निधी मंजूर

**आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या पाठपुराव्याला यश**

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१४ सप्टेंबर -**
तालुक्यातील तगरखेडा येथील बंधाऱ्याच्या गळतीमुळे शेतकरी हवालदिल झाले होते. गेट्स व यांत्रिक घटकांमध्ये झालेल्या बिघाडामुळे सिंचन साठा कमी होऊन खरीप व रब्बी हंगामात पाण्याची गंभीर टंचाई निर्माण होण्याची शक्यता होती. ही समस्या लक्षात घेऊन माजी मंत्री व आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून जलसंपदा विभागाने बंधाऱ्याच्या दुरुस्तीकरिता १ कोटी ७९ लाख ६६ हजार ७१५ रुपयांचा निधी मंजूर केला आहे.



जलसंपदा विभागाच्या आदेशानुसार, या निधीचा उपयोग बंधाऱ्यावरील सहा लोखंडी गेट्सची विशेष दुरुस्ती, यांत्रिक व विद्युत घटकांची देखभाल व बदल, सुरक्षित जलसाठ्यासाठी आवश्यक कामे, विमा, जीएसटी तसेच आकस्मिक खर्च यासाठी केला जाणार आहे. तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मंजुरीनुसार सर्व कामांचा खर्च या मंजुरीत समाविष्ट करण्यात आला आहे.

तगरखेडा बंधाऱ्यामुळे औराद-शहाजनी व निलंगा परिसरातील हजारो एकर शेतीला पाणीपुरवठा केला जातो.

गेल्या काही वर्षांपासून गळतीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. आता शासनाच्या निर्णयामुळे पाण्याची गळती थांबून जलसाठा सुरक्षित राहणार असून पिकांना आवश्यक पाणी मिळणार आहे.

स्थानिक शेतकऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत करत आमदार निलंगेकर यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

बंधनाऱ्याच्या दुरुस्तीमुळे कायमस्वरूपी उपाय होऊन आमच्या शेतीला आधार मिळेल. उत्पादनात वाढ होईल व भविष्यात पाण्याचा अपव्यय थांबेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

या मंजुरीमुळे तगरखेडा बंधाऱ्याचे आयुष्य वाढून शेतकऱ्यांच्या जीवनात दिलासा देणारा बदल घडणार आहे.

## केंद्र सरकार व बीसीसीआयचा शिरूर अनंतपाळमध्ये निषेध; पुतळा जाळला




महाविकास आघाडी कार्यकर्त्यांचे जोरदार आंदोलन, जय शाह यांचा पुतळा जाळला

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१४ सप्टेंबर -**
जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर देशभर संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय क्रिकेट बोर्डाने पाकिस्तानविरुद्ध सामना आयोजित केल्याने संतप्त महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी शिरूर अनंतपाळ येथे केंद्र सरकार व बीसीसीआय अध्यक्ष जय अमित शहा यांच्या विरोधात जोरदार निदर्शने केली.

या निदर्शनावेळी कार्यकर्त्यांनी जय शाह यांच्या फोटोंना जोडे मारून पुतळा जाळत संताप व्यक्त केला.

पहलगाम हल्ल्यातील शहीदांचा अपमान सहन केला जाणार नाही, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

केंद्र सरकारने या सामन्यासाठी परवानगी देवून जनतेच्या भावना दुखावल्या असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, काँग्रेस नेते बसवराज मठपती, नगरसेवक सुधीर लखनगावे, माजी चेअरमन शिवराज धुमाळे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहराध्यक्ष सतीश शिवणे, प्रमोद धुमाळे, अकबर तांबोळी, मुसा मुजेवार, आसिफ उजेडे, संदीप धुमाळे, संभाजी पारशेट्टे, महामुद सुगावकर, बाबुराव तोरणे, फारूख तोडेवाले, मोदिन तांबोळी, व्यंकट बेंबळगे, शंकर तोंडारे यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिरूर अनंतपाळ तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान

**अनिल घनवट यांनी केली पीक पाहणी**

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१४ सप्टेंबर -**
शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मांजरा नदीकाठच्या भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

या पार्श्वभूमीवर स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट आणि महिला आघाडीच्या अध्यक्षा सीमाताई नरोडे यांनी दौरा करून पीक पाहणी केली.




यावेळी घनवट यांनी शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या व शासनाने तातडीने मदत द्यावी अशी मागणी केली. ते म्हणाले, शासनाने वेळ न दवडता शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी. त्यांचा संपूर्ण सातबारा कोरा करावा. तसेच पुन्हा शेतकरी कर्जबाजारी होऊ नयेत यासाठी शेती व्यवस्थेत मूलभूत बदल आवश्यक आहेत. शासनाने मान्य न केल्यास स्वतंत्र भारत पक्ष आणि शेतकरी संघटना रस्त्यावर उतरतील, असा इशारा घनवट यांनी दिला.

या दौऱ्यात सीमा नरोडे यांच्यासह जिल्हाध्यक्ष कल्याण आप्पा हुरदळे, अशोक पाटील, रुपेश शंखे, दगडू पाटील पडीले, अर्जुन कावळे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच निळकंठ बिरादार, नितेश झांबरे, बालाजी जाधव, वसंत उरगुडे, तुलसीदास वाघमोडे, अभिजीत गरिबे यांच्यासह शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# तिसऱ्या दिवशीही जिल्ह्यात मुसळधार पाऊस, शेतात पाणी साचले

## औंढ्यासह जिल्ह्यातील पिकांचे आतोनात नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**



जिल्ह्यात तिसऱ्या दिवशीही मुसळधार पावसामुळे हाहाकार माजला असून शेतांना तलावाचे स्वरूप आल्यामुळे हातातोंडाशी आलेले सोयाबीनसह इतर खरीपाच्या पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ झाली असून तत्काळ पंचनामे करून आर्थिक मदत करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

जिल्ह्यातील हिंगोली, वसमत, कळमनुरी, सेनगाव सह औंढा नागनाथ तालुक्यात मागील तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. अनेक ठिकाणी नदी नाले, ओढे यांना पूर आले आहेत. अनेक ठिकाणी पूलावरून पाणी जात असल्याने काही गावांचा संपर्क तुटला आहे तर सर्वात जास्त नुकसान पिकांचे झाले आहे. औंढा नागनाथ तालुक्यातील उखळी व माथा सर्कल परिसरात रवीवारी (ता. १४) पहाटे संततधार धो-धो पावसामूळे सोयाबीन, हळद व कापसाचे पिके आडवे होऊन या पिकासह पालेभाज्या पिकांत पाणी साचल्याने तोंडाशी आलेला घास निसर्गाकडून हिरावला जातो की काय? या धास्तीने शेतकरी चिंताग्रस्त बनला आहे. संततधार पावसामुळे नदी नाले तुडुंब भरून वाहत आहेत. तर ओढे नाले भरल्यामुळे काही भागांमध्ये काही काळ रस्त्यावरील वाहतूक खोळंबली.

मध्यरात्री उखळी,माथा ,येहळेगाव( सोळंके), पिंपळदरी या सर्कलमध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्यामुळे ओढे नाले व नद्या दुथडी भरून वाहिल्या.

मध्यरात्री व पहाटे ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने येळी ,केळी तांडा,माथा, उंडेगाव ,चिंचोली निळोबा गोजेगाव साळणा अंजनवाडी धारखेडा निशाणा येहळेगाव सोळुंके, पार्डी हिवरखेडा उखळी तपोवन आजरसोंडा पुरजळ औंढा नागनाथ बेरुळा पेरजाबाद पोटा अनखळी वाडी रूपूर धार भगवा चिमेगाव, येडूद पूर वसई कंजारा जामगव्हाण पिंपळदरी फुलदाभा जांब राजापूर काकडदाभा जलालदाभा कोडसी गोळेगाव धारखेडा सुरेगाव सुरवाडी या भागात ओढ्या नाल्यांना मोठ्या प्रमाणात पूर आल्याने कापूस सोयाबीन पिके पाण्याखाली गेल्याने सर्वत्र शेतामध्ये पाणीच पाणी झाले त्यामुळे सर्व पिके पाण्याखाली गेली. पावसाच्या पाण्यामुळे तोंडाशी आलेला घास हिसकावून घेतला जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सर्वत्र शेतातील पिकात पाणीच पाणी झाल्याने शेतकऱ्यांची धांदल उडाली. सकाळीच प्रत्येकाने शेतात फेरफटका मारून पिकांतील साचलेले पाणी काढण्यावर भर दिला. सतत धार पावसामुळे सोयाबीन हळद कापूस तूर या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शासनाने औंढा तालुका ओला दुष्काळ जाहीर करण्याची शेतकऱ्यांमधून मागणी होत आहे.

संततधार पावसामुळे नद्या, नाले-ओढ्याना पूर येत आहे. अशावेळी जनतेनी दक्षता बाळगणे गरजेचे आहे. पुरापासून स्वतःला, आपल्या गुरांना सुरक्षित ठेवावे. जनतेनी वाहत्या पाण्यात उतरू नये. तसेच जास्त पाणी वाहत असल्यास वाहत्या पाण्यातून वाहन घेऊन जाऊ नये अथवा स्वतः जाऊ नये. विजा कडाडत असल्यास सुरक्षित ठिकाणी थांबावे, कोणतीही नैसर्गिक आपत्ती आल्यास स्थानिक तलाठी, पोलिस पाटील, कृषी सहायक, ग्रामसेवक, कोतवाल यांना तात्काळ माहिती द्यावी, अशा सूचना जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

# मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींचा हिंगोलीत थाटात सत्कार




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीमध्ये मुंबई येथील उच्च न्यायालयातील सत्कार सोहळ्याचे आयोजन दि १४ सप्टेबर रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले होते. यावेळी न्यायमूर्तींचा थाटात सत्कार करण्यात आला. त्यानंतर न्यायालय परिसरात वृक्षारोपन न्यायमूर्तींच्याहस्ते करण्यात आले.



सत्कार सोहळ्याचे उद्घाटन उच्च न्यायालयाचे प्रशासकीय न्यायमूर्ती, खंडपीठ नागपूर न्यायमूर्ती अनिल एस किलोर यांचेहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आर एम जोशी यांची उपस्थिती होती तर सत्कारमूर्तीमध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय जे मंत्री, न्यायमूर्ती सचिन एस देशमुख, न्यायमूर्ती महेंद्र एम नेरलीकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायधीश तुफानसिंग अकाली, वकील परिषद महाराष्ट्र व गोवाचे अध्यक्ष ॲड अमोल सावंत, वकील परिषदेचे सदस्य ॲड सतीश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

सत्कारानंतर दुपारी न्यायमूर्तीचे मार्गदर्शनही केले.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने न्यायधीश, वकील, पत्रकार तसेच जिल्ह्यातील प्रतिष्ठीत नागरिक यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष ॲड सुनीलकुमार भुक्तर, सचिव ॲड अखील अहेमद यांच्यासह वकील संघाच्या पदाधिकारी तसेच वकीलांनी परिश्रम घेतले.

## जिल्हाधिकाऱ्यांच्यावतीने संडे ऑन सायकल रॅलीला हिरवी झेंडी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**



क्रिडा मंत्रालय भारत सरकार, क्रिडा व युवक संचनालय महाराष्ट्र राज्य तसेच जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय हिंगोली, हौशी सायकलींग असोसिएशनच्यावतीने रविवार दि १४ सप्टेंबर रोजी संडे ऑन सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीला जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी हिरवी झेंडी दाखवली.

येथील जिल्हा परिषद मैदानावरून संडे ऑन सायकल रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. या रॅलीत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी स्वत: सहभाग नोंदवला. त्यानंतर मार्गदर्शन करतांना सायकलींग करणे हा सुध्दा एक खेळाचा भाग आहे. फक्त संडेलाच नव्हे तर दररोज सायकलींग केल्यामुळे शरीराला व्यायाम मिळतो. जीवनात खेळाचे अत्यंत महत्व असून खेळामुळे शारीरिक व मानसिक क्षमता वाढते. त्यामुळे युवक-युवती तसेच विद्यार्थ्यांना एकाच जागी बसून अभ्यास केल्यामुळे मानसिक ताण निर्माण होतो. अशावेळी विद्यार्थ्यांनी खेळामध्ये सहभाग नोंदवला तर त्याचा निश्चितपणे फायदा होतो. कोणताही खेळ हा शरीरासाठी चांगलाच असतो. त्यामुळे प्रत्येकाने खेळांमध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन केले. यावेळी जिल्हा क्रिडा अधिकारी मारावार यांच्यासह क्रिडा विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच हौशी सायकलींग असोसिएशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले होते.

## शक्तीपीठ महामार्ग होऊ देणार नाही- बच्चू कडू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

राज्यातील पवनार ते पत्रा देवी या सुमारे ८०२ किलोमीटरच्या शक्तीपीठ महामार्गाची कोणीही मागणी केली नाही. शेतकऱ्यांचीही मागणी नसतांनाहा महामार्ग मंजूर करून शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत केल्या जात आहेत. मात्र या महामार्गाला आमचा विरोध आहे. सरकारने या महामार्गाचे काम सुरू नये आणि सुरू केलेच तर काम बंद करून वेळप्रसंगी गोळ्या झेलण्याची आमची तयारी असल्याचा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

शेतकरी, शेतमजुर हक्क परिषदेच्या निमित्ताने वाई गोरक्षनाथ ता वसमत येथे माजी राज्यमंत्री बच्पू कडू आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलतांना बच्चू कडू म्हणाले की, राज्यात पेरणीपासून ते काढणी पर्यंतची सर्व कामे हमी योजनेमध्ये झाली पाहीजेत. तसेच कर्जमुक्ती, दिव्यांगाच्या प्रश्नांवर आमची लढाई सुरूच आहे. या मागणीसाठी शेतकरी, शेतमजूर हक्क परिषद घेतली जात आहे. पुढे परभणी, नांदेड, सोलापूर येथे कार्यक्रम होणार असून जळगाव येथे मोर्चा काढला जाणार आहे. या आंदोलनानंतरही शासनाने या प्रश्नांकडे लक्ष दिले नाही तर दि २८ सप्टेंबर रोजी बुटी बोरी नागपूर येथे सर्व एकत्र येऊन नागपूरला वेढा देणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील शेतकऱ्यांना काहीही कमी पडणार नाही असे सरकार सांगत आहे. मात्र नुकसानीचे पंचनामेच केले जात नाही त्यामुळे मदत कशी मिळणार. सरकारने पावसामुळे नुकसानीसाठी मदत जाहीर करावी, कर्जमुक्ती जाहीर करावी, शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव द्यावा अशी मागणीही यावेळी बच्चू कडू यांनी यावेळी केली.

## संक्षिप्त वृत्त

### उर्ध्व पैनगंगा प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग

हिंगोली- उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या इसापूर धरणातील पाणी पातळी नियंत्रित करण्यात येत आहे. त्यामुळे आज रविवार (दि.१४) रोजी सकाळी ८:३० वाजता १५ दरवाजांपैकी ७ दरवाजे अर्धा मीटरने उघडण्यात आले असून, सद्यस्थितीत धरणाच्या सांडव्यातून पैनगंगा नदीपात्रात ११८०० क्युसेक (३३४.१३१क्युमेक)इतका विसर्ग सुरु असल्याचे पूर नियंत्रण कक्षाकडून सांगण्यात आले आहे. तसेच सकाळपासून धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये पाऊस सुरु असल्यामुळे आणि जयपूर बंधा-यातून येणा-या येव्यानुसार आज सकाळी ८:३० वाजता सद्यस्थितीत चालू असलेल्या दरवाजांच्या विसर्गात सांडव्याचे आणखी दोन दरवाजे उघडून विसर्ग वाढविण्यात आला आहे. तसेच येणा-या येवानुसार विसर्गामध्ये टप्याटप्याने वाढ करण्यात येईल. त्यामुळे इसापूर धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढवणे किंवा कमी करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. तरी, नदी काठावरील पुरामुळे बाधित होणाऱ्या गावातील नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन इसापूर धरण पूरनियंत्रण कक्षाकडून करण्यात आले आहे.

### वसमतमध्ये माझे कुंकू-माझा देश आंदोलन




छाया : नागेश चव्हाण वसमत

वसमत-देशवासियांच्या भावनेसोबत खेळणाऱ्यांविरोधात, व्यापारासाठी भारत-पाकिस्तान सामना खेळवू पाहणाऱ्यांच्या निषेधार्थ आयोजित 'माझं कुंकू-माझा देश' या राज्यव्यापी आंदोलनात सहभागी होत केंद्र सरकारच्या दुटप्पी भूमिकेचा निषेध केला. हिंगोली जिल्ह्यांत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने माझं कुंकु-माझा देश आंदोलन करण्यात आले यावेळी शिवसेना महिला जिल्हा प्रमुख डॉ सौ रेणुका पतंगे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख अनिल कदम, डॉ डी बी पार्डीकर तालुका प्रमुख, शहरप्रमुख काशिनाथ भोसले, शिवसेना महिला उपजिल्हाप्रमुख सौ मीरा पांचाळ, शिवसेना महिला तालुका प्रमुख सौ प्रिती दळवी, शिवसेना महिला शहरप्रमुख सौ संगीता स्वामी, सौ मीरा दातार, सौ उमा ताई, उपतालुकाप्रमुख पिंटू गुजर, शिवाजी शिंदे सर्कल प्रमुख, राजु क्षीरसागर, सुरेश स्वामी, शिवाजी कर्हाळे व शिवसेना युवासेना तसेच सर्व हिंगोली महिला आघाडी चे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

### ५२ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमाचंचे उल्लंघन करणाऱ्या ५२ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कारवाई करीत त्यांच्याकडून ३ हजार ३४५ रूपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे.

## कोनाथा गावात पुराचे पाणी घुसले, शेती पिकांचे आतोनात नुकसान




**मारोती बेंडे**
**वसमत, १४ सप्टेंबर**

वसमत तालुक्यातील सतत चार दिवसापासून मुसळधार पाऊस सुरू आहे. कोनाथा, तेलगाव, रिधुरा या गावात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतामध्ये पाणी साचल्यामुळे हातातोंडाशी आलेली पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामध्ये कापूस, सोयाबीन, हळद आदी पिकांचा समावेश असून ढगफुटी सदृश्य पाऊस तिन्ही गावांमध्ये झाला आहे. हयातनगर मंडळामध्ये सुद्धा अतिवृष्टी झाली आहे. शासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करावी अशी शेतकरी वर्गातून मागणी होत आहे. कोनाथा व तेलगाव या गावांमध्ये तलाठी जायभाय व ग्रामसेवक संजय कातोरे यांनी गावात येऊन शेतकऱ्यांशी मार्गदर्शन व पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी यासाठी शासनाकडे शेतीचे ज्या पिकाचे नुकसान झाले त्या पिकाचा फोटो गट नंबर शेतकऱ्यांचे आधार, सातबारा होल्डिंग असे डॉक्युमेंट तयार करून तलाठी व ग्रामसेवक संपर्क करून देण्यात यावी अशा सूचना शेतकऱ्यांना देण्यात आली आहे. पंचनामा करण्याच्या मागणीसाठी ग्राम पंचायतमध्ये मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग आला होता. शासनाने तातडीने मदत द्यावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

## तरूणीच्या विनयभंगाचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या महिलेस मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

वसमत शहरातील एका भागात तरूणीच्या विनयभंगाचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या महिलेस मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली असून याप्रकरणी चौघांवर वसमत शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून पोलिसांनी आरोपींची शोध मोहीम सुरू केली आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, वसमत शहर पोलिस ठाण्यांतर्गत एका भागात राहणारी एक तरूणी शनिवारी दि १३ सप्टेंबर रोजी घरात झोपली होती. यावेळी शेख अनीस हा त्या भागात आला. त्याने तरूणीच्या घरात जाऊन तिचा विनयभंग केला. अचानक झालेल्या या प्रकारामुळे तरूणीने आरडाओरड केली. त्यानंतर तो पळून गेला. दरम्यान, सदर प्रकार तरूणीने तिच्य कुटुंबियांना सांगितला. त्यानंतर घडलेल्या प्रकाराचा जाब विचारण्यासाठी तरूणीच्या महिला शेख अनीस याच्या घरी गेली होती. यावेळी तिने जाब विचारला असता शेख अनीस याच्यासह चौघांनी त्या महिलेस लाकडाने मारहाण केली. तसेच केस पकडून पोटावर, पाठीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण करून मुक्कामार दिला तसेच जीवे मारण्याची धमकी दिली.

त्यानंतर त्या महिलेने थेट वसमत शहर पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी शेख अनीस, कोंडी, शेख दिनू, व तन्नू यांच्या विरूध्द रविवार दि १४ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून वसमत शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुधीर वाघ, सहाय्यक पोलिस निरीक्षक शंकर डेडवाल, महिला पोलिस उपनिरीक्षक प्रणीता ढोरे, जमादार ज्ञानेश्वर बाभळे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. उपनिरीक्षक प्रणीता ढोरे पुढील तपास करीत आहेत. या प्रकरणातील आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

## बौध्दगया महाविहार बौध्दांच्या ताब्यात देण्यासाठी हिंगोलीत धम्म रॅली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

बिहार राज्यातील महाबोधी महाविहार बौध्द भिक्खू आणि बौध्द अनुयायी यांच्या ताव्यात देणे तसेच महाबोधी महाविहार ट्रस्ट मध्ये महाराष्ट्रातील एका बौध्द भिक्खुची प्रतिनिधी म्हणुन नियुक्ती यासह इतर मागण्यासाठी १३ सप्टेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयावर धम्म रॅली काढण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रशासनामधील तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांना निवेदन देण्यात आले. यावेळी हे निवेदन केंद्रीय गृहमंत्री यांच्यासह बिहार राज्यपाल, मुख्यमंत्री अनेकाकडे त्या मागण्याचे निवेदन पाठविण्यात येणार असल्याचे आश्वासन देण्यात आले.

विश्व शांतीदूत महाकारणी तथागत भगवान बुध्द भारतभुचे वैभव आहेत.भारतच नाही तर संपूर्ण जगाने भगवान बुध्दांच्या तत्वज्ञानाचा पुरस्कार केलेला आहे. जगाच्या पातळीवर समता, न्याय, बंधुता ही बुध्दांची शिकवणुक सर्वश्रेष्ठ मानली गेली आहे. बौध्द धम्माच्या आर्यअष्टांगिक मार्गाचा स्विकार करण्याकडे आज समस्त मानव जातीमध्ये ओढा लागलेला आहे. मानवजातीच्या कल्याणाचा मार्ग दाखविणारे तथागत भगवान बुध्द यांना बिहार राज्यात बुध्दगया येथे ज्ञानप्राप्ती झाली. बुध्दगया येथील जगप्रसिध्द महाबोधी महाविहार येथे देश व विदेशातुन लाखोंच्या संख्येने बौद्ध धर्मिय नागरिक आणि पर्यटक येत असतात.



बुध्दगया येथील महाबोधी महाविहार हे बौध्द धर्मियांचेच पवित्र स्थळ आहे. हे सर्वश्रुत आहे. परंतु बिहार राज्याच्या बुध्दगया मंदिर कायदा (अधिनियम) १९४९ नुसार महाबोधी महाविहारावर बौध्द धर्मिय नसलेल्या इतर धर्मियांनी अनैसर्गिकपणे ठाण मांडलेले आहे. पु. भिक्खू विनयाचार्य, पु भिक्षु मुदितानंद येरो,पु. भिक्खु बुद्धकिर्ती थेरो, पु. भिक्खु चंद्रमुनी, पु. निभ्णु धम्मधोष, पु भिक्भु पंथ्यावर्धन,पु भिक्खू संघप्रिय ,भतेप्राधि,भार्याथम नैना,सारिपुत्त भन्ते, भन्ते शासन ज्योती यांच्या मार्गदर्शनाखाली १३ सप्टेंबर रोजी धम्म रॅली जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढून विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले. यावेळी मधुकर मांजरमकर, दिवाकर माने, मिलिद उबाळे, प्रा. डॉ. सुखदेव बलखंडे, बडु नरवाडे,प्रा. डॉ. किशोर इंगोले,प्रा. प्रशांत चाटसे, अमर मोरे, प्रा. डॉ. कृष्णा इंगळे, रविंद्र वाढे,टी.एम-पोघे, अक्षय इंगोले, ॲड. रावण धाबे, ॲड. सुभाष वाघमारे, अनिल पुंडगे, भिमराव सपकाळ, बबन भुक्न्तर, प्रा. बाबासाहेब इंगोले, योगेश नरवाडे, लखन खंदारे, नितीन खिलारे, प्रकाश इंगोले, ज्योतीपाल रणवीर, शांताबाई धाबे, सौ. सुद्धा सपकाळ यांच्यासह हजारो महिला पुरुष हातामध्ये धम्मध्वज घेत रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

## राठोड यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

ऑल इंडीया बंजारा सेवा संघाच्या जिल्हाध्यक्षपदी भागोराव राठोड यांची दि १४ सप्टेंबर रोजी निवड करण्यात आली.

यावेळी हिंमत राठोड, अशोक पवार, ॲड पंजाब चव्हाण यांच्यासह बंजारा समाजबांधव यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी बंजारा समाजाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राठोड यांनी बंजारा सेवा संघाची उद्दीष्टे व तळागाळातील गोरगरीब जनतेत जागृती व सामाजिक दायित्व पार पाडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मुसळधार पावसाने जिल्हा निघाला न्हाऊन

## नदी, नाले, ओढ्यांना पूर : ९ महसूल मंडळात अतिवृष्टी : खरिप पिकांचे प्रचंड नुकसान :

**मोहन धारासूरकर**

**परभणी /प्रतिनिधी-** परभणी तालुक्यासह जिल्ह्यातील विविध भागात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने हाहाकार माजवला आहे. सतत कोसळणाऱ्या पावसामुळे छोट्या-मोठ्या नद्या-नाल्यांना पूर आला असून सखल भागांत मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. परिणामी खरीप हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाला आहे.

भारतीय हवामान खात्याच्या मुंबई येथील प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्राच्या वतीने जिल्ह्यात ११ ते १५ सप्टेंबर दरम्यान यलो अलर्टचा इशारा दिला होता. त्यानंतर १२ सप्टेंबरपासून या जिल्ह्यात मूसळधार पावसाला सुरुवात झाली. अचानक झालेल्या या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन, कापूस, तूर, मका यांसारखी खरीप पिके पाण्याखाली गेली आहेत. काही दिवसांपूर्वी पावसामुळे नदीनाले, ओढे व तलाव तुडुंब भरले होते, तर शेतसुद्धा तळ्याचे स्वरूप धारण करून पिके जलमय झाली होती. पावसाने काही दिवस विश्रांती घेतल्याने शेतकर्यांच्या मनात आशा पल्लवित झाली होती की सोयाबीन, कापूस व ज्वारी यांचे उत्पादन वाचेल. परंतु मागील दोन दिवसांपासून पुन्हा झालेल्या जोरदार पावसाने ही आशा धुळीस मिळाली असून शेतांमध्ये सर्वत्र पाणी साचले आहे आणि पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी हतबल झाले असून शासनाने तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी व शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे.

शनिवारी दुपारीही सुमारे चार वाजता आकाश गडद ढगांनी व्यापलेले होते आणि अचानक आलेल्या पावसामुळे शहरातील काही भागांत पाणी साचून राहिले.

### जिल्ह्यातील ९ महसूल मंडळात अतिवृष्टी...

**मागील दोन दिवसांपासून सुरु असलेल्या मूसळधार पावसामुळे जिल्ह्यातील नऊ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टी नोंदवण्यात आली आहे. महसूल प्रशासनाने दिलेल्या १३ सप्टेंबरच्या अहवालानुसार परभणी तालुक्यात सिंगणापूर येथे ६५.५ मिमी, पिंगळी येथे ९५ मिमी, तर परभणी ग्रामीण भागात ९५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. पूर्णा तालुक्यात पूर्णा येथे १३९ मिमी, ताडकळस येथे ९६.३ मिमी आणि कात्नेश्वर येथे १४७.५ मिमी पाऊस झाला आहे. पालम तालुक्यात पालम येथे ७९.८ मिमी, बनवस येथे ७५.८ मिमी, तर पेठशिवणी येथे ८९.३ मिमी पावसाची नोंद झाली आहे.**



भारतीय हवामान खात्याने आगामी दोन ते तीन दिवस जिल्ह्यात पावसाची शक्यता व्यक्त केली असून, सध्यस्थितीत अतिवृष्टीचा इशारा जारी आहे. जिल्हा प्रशासनाने सर्व जनतेला वेळोवेळी जागरूक केले आहे. नदीकाठच्या गावातील नागरिकांनी प्रशासनाच्या अद्यावत सूचनांचे पालन करून सतर्क राहावे, असे आवाहन मा. जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. तसेच, आगामी १७ सप्टेंबर पर्यंत येलो अलर्ट जारी असल्याने सर्व यंत्रणांनी सतर्क राहावे आणि आपत्कालीन घटना घडल्यास तात्काळ जिल्हा नियंत्रण कक्षाच्या क्रमांक ०२४५२-२२६४०० वर संपर्क करण्याचे निर्देश मा. अपर जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### बोर्डीकर कन्या विद्यालय खो-खो स्पर्धेत तालुक्यात सर्वप्रथम क्रमांक



**जिंतूर,/प्रतिनिधी :** येथील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर कन्या विद्यालयाने तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत सतत चार वर्ष विजेतेपद राखून जिंतूर तालुक्यात नावलौकिक मिळवलेला आहे.

तालुका क्रीडा कार्यालय च्या मैदानावर आयोजित केलेल्या तालुकास्तरीय स्पर्धेत( १७ वर्षा आतील मुली) च्या गटात. अंतिम सामन्यात शारदा विद्यालय आडगाव बाजार या संघाचा बोर्डीकर कन्या विद्यालय दणदणीत पराभव करून विजेतेपद आपल्याकडेच राखले.

तालुका क्रीडा कार्यालय आयोजित १७ वर्षे आतील मुलींच्या गटात कु. प्रज्ञा तारू,( कर्णधार) सगुना वाघ, (उप कर्णधार )स्नेहल आघाव, श्रद्धा पालवे, वैष्णवी आघाव, कु. वैष्णवी काकडे , कार्तिकी काकडे , कोमल काकडे, या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत बोर्डीकर कन्या विद्यालयाचा संघाने विजय सहज प्राप्त केला व हा संघ जिंतूर तालुक्याचे नेतृत्व परभणी जिल्ह्यावर करणार आहे. मागच्या वर्षी सुद्धा याच संघाने परभणी जिल्ह्याचे नेतृत्व विभागीय स्तरावर खो-खो या स्पर्धेत केलेले होते. या मिळविलेल्या घवघवीत यशाबद्दल मा. मेघना दीदी बोर्डीकर ( राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य) संस्था अध्यक्षा सौ. मीनाताई बोर्डीकर, सचीव मा.आ. श्री रामप्रसादजी बोर्डीकर, संचालिका नयना दीदी बोर्डीकर , वंदना काळदाते ( मुख्याध्यापिका ) अनिल मेटांगळे, प्रभाकर अंभुरे, सुभाष भगस, संजय जोशी, प्रशांत देशमुख, सुबोध मते, यासह आदींनी विजय खेळाडूंचं अभिनंदन केले आहे.

### प्रॉस्परस पब्लिक स्कूल सेलू येथे हिंदी दिवस उत्साहात साजरा



**सेलू,/प्रतिनिधी-** सेलूतील श्रीराम प्रतिष्ठान अंतर्गत प्रॉस्परस ब्लिक स्कुल येथे राष्ट्रीय हिंदी दिन साजरा करण्यात आला होता.

श्रीराम प्रतिष्ठान अंतर्गत प्रॉस्परस पब्लिक स्कूल सेलू येथे आज राष्ट्रीय हिंदी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात संत कबीरदास यांच्या प्रतिमापूजन आणि झाली तसेच दरवर्षी १४ सप्टेंबर रोजी साजरा होणाऱ्या या दिवसाचे औचित्य साधून शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हिंदी ही भारताची राजभाषा म्हणून १९४९ मध्ये स्वीकारली गेली, या दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देणे आणि भाषेबद्दल त्यांच्यात आवड निर्माण करणे हा या कार्यक्रमांचा मुख्य उद्देश होता.

यानिमित्ताने शाळेच्या प्रांगणात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेच्या महत्त्वावर एक प्रभावी भाषण दिले. तसेच, हिंदी भाषेचे महत्त्व या विषयावर एक निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, ज्यात अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी एक काव्यवाचन स्पर्धा आणि हिंदी संवाद-लेखन कार्यशाळा देखील आयोजित करण्यात आली.

कार्यक्रमाची सांगता हिंदी गीतांच्या सादरीकरणाने झाली. हिंदी विभाग प्रमुख सौ गायत्री हरदेकर यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचा आदर करण्यास आणि तिच्या अभ्यासाला प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेविषयी प्रेम आणि आदर निर्माण झाला आहे, असे त्यांनी नमूद केले. यावेळेस श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. संजय रोडगे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. प्रगती क्षीरसागर व इतर शिक्षकवृंद उपस्थित होते

### शांतीदास वैष्णव यांचे निधन



**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर येथील संतोषी माता मंदिराच्या बाजूला बलसा रोडवर शांती दास सोनू दास वैष्णव ८५ वर्षे यांचे शनिवारी सकाळी आठ वाजता दीर्घ आजारांनी निधन झाले त्यांचा अंत्यसंस्कार दुपारी चार वाजता जिंतूर येथील वैकुंठ धाम समशान भूमीमध्ये करण्यात येणार आहे त्यांच्या पश्चात मध्ये तीन मुले एक मुलगी वाल्मीक वैष्णव कुणाल वैष्णव राहुल वैष्णव हे तीन मुले असून एक मुलगी आहे त्यांच्या निधनामुळे वैष्णव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे जिंतूर येथील माजी नगरसेवक राजेभाऊ वैष्णव यांचे ते मेहुणे होते.

### जिल्हयात सोयाबीन पिक धोक्यात

**परभणी,/प्रतिनिधी-** जिल्हयात मोठया प्रमाणात मुसळधार पाऊस झाला असल्यामुळे आता जिल्हयातील सोयाबीन पिकांना मोठे नुकसान होणार आहे. सध्या पिकांनी माना टाकल्या आहेत. परंतू त्यातच होणाऱ्या मुसळधार पावसामुळे जमिन ओली राहत आहे. त्यामुळे या जिल्हयात सोयाबीन पिकांचे क्षेत्रपळ यावेळी मोठया प्रमाणात घटणार असे चित्र दिसून येत आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाड्यामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# सोनपेठ ग्रामीण रुग्णालयातील तीन डॉक्टर गायब

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** येथील ग्रामीण रुग्णालयातील तीन डॉक्टर अचानक गायब झाले असल्यामुळे रुग्णालयाची सेवा कोलमडली आहे.कुठल्याही प्रकारची अधिकृत रजा न देता रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांना व्हॉट्सॲप वर रजा पाठवून गेली चार दिवसांपासून एकएक करून तीनही डॉक्टर अचानक गायब झाले आहेत. कामावर न येण्याचे ठोस कारण मात्र कळू शकले नाही.

गेली आठ दिवसांपूर्वी एका व्यक्तीने अचानक दवाखान्यात येऊन आतील बाजूने मोबाईल वर व्हिडिओ शुटिंग सुरू केली. यावेळी दवाखान्यात डॉक्टर नसल्याचेही सांगितले गेले. परंतू या बाबतीत संबंधित डॉक्टरांना विचारणा केली असता आम्ही नियमानुसार दररोज सेवा देत असून बाहेरील काही लोकांकडून आम्हाला जाणिवपूर्वक वेठीस धरुन आर्थिक मागणी केली जात असल्याचे नांव न सांगण्याच्या अटीवर डॉक्टरांनी सांगितले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. सिद्देश्वर हलगे, डॉ.बिभीषण जाधव व डॉ.भारत चव्हाण या तिघांनी दि.१० सप्टेंबर पासून एक एक करून विना रजा दवाखान्यात येऊन सेवा देणे बंद केले आहे. परिणामी येथील ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांची तपासणी व उपचार सेवा विस्कळित झाली आहे.या गंभीर बाबीकडे वरिष्ठांनी तात्काळ लक्ष देण्याची गरज आहे.यावेळी तालुक्यातील रुग्णांना अडचणींचा सामना करावा लागू नये म्हणून रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून संबंधित डॉक्टरांची जिल्हा शल्य चिकित्सक परभणी यांच्याकडे तक्रार केली आहे. तसेच बाहेरील नवीन डॉक्टरांची नियुक्ती करुन दवाखान्याची सेवा सुरळीत चालू करण्यात आली असल्याचे दिसून आले.

येथील ग्रामीण रुग्णालयात कामावर न येता राजकीय वजन वापरून अनाधिकृत सुट्टी मारण्याचे प्रकार येथील काही डॉक्टरांकडून मागील एक वर्षेभरापासून सुरू आहेत. या अशा प्रकारास येथील वैद्यकीय अधीक्षक सुद्धा वैतागले असून यावेळी त्यांनी नियमित ड्यूटी न करणाऱ्या डॉक्टरांची यापुढे गय करणार नसून कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. अचानक व्हॉट्सॲप वर रजा टाकून तीची मंजूरी न घेता ड्यूटी न करणे हे चुकीचे असून या बाबतीत मी वरिष्ठांना लेखी तक्रार केली आहे.तसेच येथील ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून तात्काळ गंगाखेड येथील नवीन एक डॉक्टरांची नियुक्ती केली असून दवाखान्यातील ईतर डॉक्टर व्यवस्थीत सेवा देत आहेत. नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास न ठेवता ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा.

**डॉ.विठ्ठल कराड, वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय सोनपेठ.**

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाडा म्हणून जिंतूरात साजरा होणार




**जिंतूर,/प्रतिनिधी :** देशाचे कर्तव्य दक्ष लोकप्रिय पंतप्रधान श्री नरेंद्र जी मोदी साहेब, यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने १७ सप्टेंबर २०२५ ते २ आक्टोबर २०२५ या कालावधीत सेवा पंधरवडा म्हणुन साजरा करण्यासाठी जिंतूर तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात बैठक ठेवण्यात आली होती तरी या बैठकीसाठी परभणी जिल्हा उपाध्यक्ष श्री हरी शेवाळे,माजी जिल्हा अध्यक्ष भागवत दळवी सेलू , जिल्हा सचिव तथा तालुका विधानसभा प्रमुख डॉ दराडे, अल्पसंख्याक जिल्हा अध्यक्ष मतीन तांबोळी, तालुका अध्यक्ष गोविंद थिटे पाटील, मंडळ अध्यक्ष विलास भंडारी, अल्पसंख्याक शहर अध्यक्ष माबुद कुरेशी, शहर मंडळ सरचिटणीस आवेस खान पठाण, माजी जिल्हा परिषद सदस्य सुनील मते, व सर्व भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते या बैठकीत पंतप्रधान साहेबांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सेवा पंधरवडा म्हणुन साजरा करण्याचे ठरवले आहे.



### मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी भागवत पोपडे

**सेलू/प्रतिनिधी-** मराठी पत्रकार परिषद संलग्न तालुका पत्रकार संघाची बैठक शुक्रवारी सोनपेठ येथील बाजार समितीच्या सभागृहात पार पडली. यावेळी सोनपेठ तालुकाध्यक्ष पदी भागवत पोपडे तर कार्याध्यक्ष पदी सोमनाथ नागुरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

सोनपेठ तालुका पत्रकार संघाची बैठक जेष्ठ पत्रकार बाबासाहेब गर्जे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी व्यासपीठावर पत्रकार परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे,परभणी जिल्हाध्यक्ष प्रभू दीपके, लक्ष्मण माणोलीकर, राजकूमार हट्टेकर, जिल्हा उपाध्यक्ष शिवमल्हार वाघे यांची उपस्थिती होती. यावेळी झालेल्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर तालुकाध्यक्ष पदी भागवत पोपडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.उपाध्यक्ष पदी सुभाष सावंत,सचिव गजानन चिकणे, सहसचिव आशिष मुंडे, कार्याध्यक्ष सोमनाथ नागुरे, कोषाध्यक्ष गोविंद नाईक, संघटक कल्याण वाघमारे, सल्लागार खदीर विटेकर, सदस्य महादेव नरवटे, अनिल लोलगे, प्रशांत बिराजदार, अमोल दहिवाळ , प्रेमाकर कोठुळे,आदींची निवड करण्यात आली.सर्व करण्यात आली.

# जि.प.उच्च प्रा.शाळा मानधानी मुलींचा संघ खो-खो स्पर्धेतील जिंतूर तालुक्यात द्वितीय स्थानी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुकास्तरीय मुलींच्या खो-खो स्पर्धा घेण्यात आल्या या स्पर्धेमध्ये कर्णधार पूनम जाधव व उपकर्णधार पूजा मुळे नेतृत्वाखाली जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मानधनी संघाने स्पर्धेतील पहिला सामना मजबूत अशा जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जिंतूर संघा सोबत झाला व त्याना १४ - ० अशा फरकाने हरवून एकेरी राऊंडमध्ये विजय मिळवला.



दुहेरी राऊंडमध्ये जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बोरी या संघाला सुद्धा १५ - १ फरकाने हरवून मानधानी संघाने विजय मिळवत तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. शारदा विद्यालय आडगाव बाजार या संघाविरुद्ध- ५ मीनिटात ३ तर मानधानी संघाने - २ मिनिटात ४ आऊट करून आडगाव संघाला नमवून विजय प्राप्त केला. चौथ्या फेरीमध्ये म्हणजे कॉटर फायनल मध्ये प्रवेश केला. त्या नंतर सेमी फायनला बलाढ्य संघ, शारदा माध्यमिक उच्च मा.विद्यालय आडगाव बाजार या संघाला ६ - १ने पराजय करून मानधानी संघाने विजय मिळवत फायनल मध्ये प्रवेश केला . हा अंतिम फेरीतील सामना खेळताना दरवर्षी विभागीय सामने खेळणारा बेलखेडा संघा सोबत सामना करत असताना एक इनींग संपल्यानंतर वरूण राजानी रिपरिप सुरू केली, पावसामध्येच हा सामना चालू असताना विरुद्ध संघासोबत विजयासाठी संघर्ष करावा लागला, त्यावेळी ग्राऊंड पूर्णतः ओले झाले होते तरी शेवटपर्यंत निकाराने लढणारा मानधानी संघ सामन्याच्या अंतिम टप्यात येऊन २-४ फरकाने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मानधानी संघाला उपविजेता संघ म्हणून मान मिळाला..

तालुकास्तरीय द्वितीय क्रमांकाने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मानधनी संघ विजय झाला. मानधानी संघाचे विशेष वैशिष्ट्ये- जिंतूर तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये संघाने सुरुवाती पासून शेवट पर्यंत कायम दबदबा ठेवून वर्चस्व निर्माण केले. संघाला आत्मविश्वास,जिद्द, चिकाटी,सांघिक भावना,खेळातील कौशल्य, स्पर्धेतील इतर संघाकडून मिळालेले कौतुकाची शाबासकी, तालुका संयोजक कमिटी यांच्याकडून मिळाले प्रोत्साहन, यामुळे आमच्या संघातील खेळाडूंचा आनंद ओसंडून वाहत असताना जेव्हा बघत होतो, तेव्हा आम्ही सर्व शिक्षकवृंद आनंदित झालो.. असे काही क्षण विद्यार्थ्यांच्या कायम स्मरणात राहून ज्ञानाची शिदोरी वाढत जाणारी असते..... आपण फक्त संधी उपलब्ध करून दिली पाहिजे... सर्व संघातील खेळाडूंचे व त्यांच्या आई- वडिलांचे खूप खूप मनःपूर्वक अभिनंदन ....क्रिडास्पर्धेला प्रोत्साहन गटशिक्षणाधिकारी श्री पोले साहेब,केंद्र प्रमुख श्री तोडकर सर, शाळेचे मुख्याध्यापक श्री साबळे सर यांनी दिले. विद्यार्थ्यांना खेळातील विशेष कौशल्यांचे मार्गदर्शन करणारे क्रीडा मार्गदशक श्री खुडे सर,श्री इक्कर सर,श्री वावरे सर,श्री देशमुख सर,विशेष सहकार्य श्री बोंबले सर,श्री मत्रे सर,श्री दराडे सर,श्री शेळके सर,श्री भाग्यवंत सर,श्रीमती पंडित मॅडम,श्रीमती वडकूते मॅडम,श्रीमती वावरे मॅडम व शालेय व्य.समिती अध्यक्ष,उपाध्यक्ष सर्व सदस्य आणि सर्व मानधानीकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले

# नूतन विद्यालय संस्काराचे विद्यापीठ : श्याम मणियार

## ५३ वर्षांनंतर शालेय परिसरात जागवल्या आठवणी

**सेलू,/प्रतिनिधी-** नूतन विद्यालय हे संस्काराचे विद्यापीठ असून आम्ही त्या शाळेचा अंश असल्याचा आम्हाला अभिमान आहे. समर्पण, त्याग, निष्ठा, देशभक्तीचे संस्कार प्रशालेने आमच्यावरती केल्यामुळेच आम्ही आज आमच्या जीवनात स्वाभिमानाने उभे आहोत. अशी भावना माझी विद्यार्थी श्याम मणियार यांनी व्यक्त केली.

नूतन विद्यालयातील १९७२ च्या माजी विद्यार्थ्यांनी रविवार ( दि. १४ ) रोजी शाळेस भेट दिली. वर्ग मित्रांसोबत प्रभात फेरीने बालाजी मंदिरापासून नूतन विद्यालयात माजी विद्यार्थी आले. ५३ वर्षानंतर आपली शाळा पाहून ते भारावून गेले. शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांनी वाजत गाजत माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. शाळेच्या वतीने शब्दरूपी भावनांचे सन्मानपत्र, शालेय दैनंदिनी, गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. ५३ वर्षांनी नव्याने बालपण, विद्यार्थीदशा अनुभवत प्रार्थना, राष्ट्रगीत, राज्यगीत आणि प्रतिज्ञा म्हटली. स्नेहमिलन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. एम. लोया हे होते. तर व्यासपीठावर नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डी.के. देशपांडे, सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर, सहसचिव जयप्रकाश बिहाणी, कार्यकारणी सदस्य नंदकिशोर बाहेती, दत्तराव पावडे, अजिज खाँ पठाण, राजेश गुप्ता, माजी विद्यार्थी हेमंतराव आडळकर, उद्योजक रामप्रसाद घोडके, मुख्याध्यापक संतोष पाटील, निशा पाटील, उल्हास पांडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात डॉ. सुभाष परताणी यांनीही आपली भावना




व्यक्त केली. सेल्फी पॉईंट मध्ये फोटो काढण्याचा माजी विद्यार्थ्यांनी आनंद लुटला. प्रास्ताविक मुख्याध्यापक संतोष पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुरेश हिवाळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. पल्लेवाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# सरकारने फुकट वाटणे बंद करावे : जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य



**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. १४ सप्टेबर-**

आरक्षणाच्या चक्रव्यूहात सर्वच राजकीय पक्ष फसले असून शासनाने आता काही गोष्टी फुकट वाटण्या ऐवजी त्यावरील खर्च सर्वच जातीतील मुला मुलींना मोफत शिक्षण उपलब्ध करून द्यावे व बेरोजगारांना उद्योग धंदे, व्यवसाय उभारण्यासाठी बिनव्याजी भांडवल व लागणाऱ्या सुविधा बिनव्याजी दिले पाहिजे असे जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी यांनी बाऱ्हाळी येथील पत्रकारांशी धर्मगुरू या नात्याने संवाद साधतांना आपले मत व्यक्त केले .

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी संस्थान नानिज धामच्या वतीने अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमा अंतर्गत दोस्तपल्ली बंगारपल्ली ,जुक्कल जिल्हा कामारेड्डी (तेलंगणा)येथे शनिवार दि. १२ व १३ सप्टेंबर रोजी समस्या व मार्गदर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. तेव्हा त्यांनी पत्रकारांशी विविध मुद्द्यावर संवाद साधला. सध्या राज्यात ज्वलंत विषय असलेल्या आरक्षण या विषयावर धर्मगुरू म्हणून त्यांनी आपले मत सडेतोडपणे मांडले. आरक्षणाच्या चक्रव्यूहात सर्वच राजकीय पक्ष फसले आहेत. आरक्षण हा राजकीय मुद्दा बनला आहे. सरकार काही वस्तू फूकट वाटप करण्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च करत आहे. सरकारने आता त्या फुकट गोष्टी लोकांना वाटण्यापेक्षा त्याचा खर्च सर्वच जातीसाठी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण,नोकरी व बेरोजगारांना उद्योगधंदे व्यवसाय उभारण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत सोई - सुविधा व बिनव्याजी भांडवल यावरच खर्च करावा. तेव्हा कुठे हा समाजातील मागास घटक पुढे येईल. आज शिकणारी मुले व नवीन उद्योजक हेच देशाचे भांडवल आहेत. तयार झालेला माल, वस्तू योग्य दरात शासनाने खरेदी कराव्यात. शेतीमालाला योग्य तो हमीभाव द्यावा. शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाचे दाम मिळत नाही अशा अनेक कारणामुळे शेतकऱ्याची प्रगती होताना दिसत नाही. फुकट वाटल्याने लोकांची श्रमशक्ती कमी होऊन देश मागे येईल. त्याऐवजी अनेकांच्या हाताला काम द्यावे. आरक्षणात व राजकारणात घराणेशाहीच वाढीला लागली आहे. सर्वच जातीतील वंचित घटक हा कायमच मागे राहत आला आहे. तळागाळातील सर्व घटकांचा विकास होईल व समाज सुधारेल त्या दृष्टीने डॉ. बाबासाहेबांनी जे आरक्षण ठेवले आहे. मात्र आज आरक्षणास राजकीय स्वरूप देऊन समाजात, जाती-जातीत भांडणे होत आहेत. हे लक्षात घेतले पाहिजेत. जाती-जातीत होणारा कलह थांबवला पाहिजे. धर्मातील सर्वच जातीमधील वंचित घटकांच्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत असे हे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी बा-हाळी पत्रकार संघाचे उत्तम वाडीकर, साईनाथ कोटगीरे, दत्तात्रय तिपणे,सन्मूख मठदेवरु यांच्या सह तेलगू भाषिक पत्रकार उपस्थित होते.



# मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते नोकरीचे आदेश देणार

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १४ सप्टेबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि पुणे येथील एस्पायर नॉलेज स्किल्स कंपनीतर्फे आज १३ सप्टेंबर रोजी मेगा जॉब फेअर घेण्यात आला. भर पावसातही बेरोजगार तरुणांनी या जॉब फेअरला उपस्थिती लावून चांगला प्रतिसाद दिला. संपूर्ण महाराष्ट्रातून बेरोजगार विद्यार्थी मुलाखतीसाठी येथे आले होते. ३० कंपन्यांच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. जवळपास दोन हजार विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या २०सप्टेंबर रोजी दीक्षान्त समारंभामध्ये महाराष्ट्र राज्याची उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा. ना. चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते नियुक्ती आदेश देण्यात येणार आहेत, असे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी कळविले आहे.

### स्वारातीम विद्यापीठातील मेगा जॉब फेअरला उत्सफुर्त प्रतिसाद

या जॉब फेअर मध्ये छत्रपती संभाजीनगर, पुणे, मुंबई, नाशिक, नांदेड आणि हैदराबाद येथील जवळपास ३० कंपन्यांनी सहभाग घेतला होता. आय.टी.आय., बारावी पास, पदवीधर, पदव्युत्तर, डिप्लोमा, इंजीनियरिंग इत्यादी अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या. परदेशी भाषा अवगत असलेल्या विद्यार्थ्यांना तर भारताबाहेर नोकरीचे संधी या फेअरच्या माध्यमातून देण्यात आल्या आहेत.

यापुढे वर्षातून दोन वेळा जॉब फेअरचे आयोजन विद्यापीठामध्ये करण्यात येणार आहे, असा सामंजस्य करा पुणे येथील एस्पायर नॉलेज अँड स्किल्स कंपनीसोबत करण्यात आला आहे. ज्या विद्यार्थ्यांना या जॉब फेअरमध्ये नोकरी मिळाली नाही, त्यांच्याकडून विविध आवश्यक ते ऑनलाईन कोर्स करून घेण्यात येणार आहेत व त्यांना पुढील मुलाखतीसाठी तयार करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी नोकरी लागण्यासाठी व स्वतःच्या पायावर उभारण्यासाठी संपूर्ण मदत विद्यापीठातर्फे करण्यात येणार आहे, असेही कुलगुरू डॉ. चासकर यांनी यावेळी सांगितले.

यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, एस्पायरचे संचालक संजय गांधी, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. डी.एन.मोरे, नारायण चौधरी, अधिसभा सदस्य दीपक मोरताळ, अधिष्ठता डॉ.एम. के. पाटील, डॉ. डी. एम. खंदारे यांची प्रमुख उपस्थिती होती. या मेगा जॉब फेअरला यशस्वी करण्यासाठी समन्वयक डॉ. शशिकांत ढवळे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. बालाजी मुधोळकर, डॉ. कृष्णा चैतन्य, डॉ. योगेश लोलगे, डॉ. अर्चना साबळे, डॉ. नितीन दारकुंडे, डॉ. राजकुमार मून, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी परिश्रम घेतले आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### सरस विद्यालयास तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक

**किनवट**-दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महाराष्ट्र शासन शिक्षण व क्रीडा विभागामार्फत पावसाळी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत व्हॉलीबॉल, क्रिकेट, कबड्डी, खो-खो तसेच वैयक्तिक क्रीडा प्रकारांचा समावेश होता. याच अनुषंगाने दिनांक १३ सप्टेंबर रोजी किनवट येथील पोतदार लर्न स्कूल येथे तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत सरस विद्यालय इंग्रजी माध्यम, मांडवी येथील वयोगट १४ व वयोगट १७ च्या संघांनी आपली उज्ज्वल कामगिरी कायम ठेवत तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला. उत्कृष्ट खेळकौशल्य, संघभावना व प्रशिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळे सरस विद्यालयाने पुन्हा एकदा क्रीडाक्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध केले. स्पर्धे नंतर आयोजित सत्कार समारंभास उपस्थित राहून इंदिराबाई राठोड ट्रस्ट मांडवी चे अध्यक्ष गंगन्ना नेम्मानीवार, उपाध्यक्ष ईसाखान , सचिव नितिन राठोड, कोषाध्यक्ष माधव श्रिमनवार तसेच सर्व सदस्यांनी विजयी संघाचे अभिनंदन केले. या प्रसंगी सरस विद्यालय इंग्रजी माध्यमाचे प्राचार्य डॉ. श्रिनिवास रेड्डी, सरस माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य रमेश पडगिलवार, तालुका क्रीडा संयोजक संदिप येशीमोड, दोन्ही माध्यमातील शिक्षकवर्ग, पालकवर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलणाऱ्या क्रीडा प्रशिक्षक कुणाल राठोड व शैलेश राठोड यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या मेहनतीमुळे विद्यार्थ्यांनी खेळात उत्तुंग यश संपादन केले असल्याचे सर्व मान्यवरांनी गौरवोद्गार काढले.या विजयामुळे सरस विद्यालय इंग्रजी माध्यम, मांडवीचे नाव तालुकास्तरावर अधिक उजळले असून, आता पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेतही या संघाकडून तितकीच भव्य कामगिरी होईल, अशी अपेक्षा सर्व स्तरांतून व्यक्त करण्यात येत आहे.

### जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी जीनियस किड्सच्या सात विद्यार्थ्यांची निवड

**माहूर**-माहूर तालुका क्रीडा समितीच्या वतीने सह्याद्री पब्लिक स्कूल येथे आयोजित तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत जीनियस किड्स इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत अतिशय नेत्रदीपक अशी कामगिरी करून विजेतेपदावर आपले नाव कोरत तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे. क्रिकेट, बॅडमिंटन व चेस अशा तीन विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेत चेस व बॅडमिंटनमध्ये जीनियस किड्सच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावत थेट जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेला गवसणी घालत आपली निवड निश्चित केली आहे. दि.०९ सप्टेंबर रोजी आयोजित तालुकास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत १४ वर्ष वयोगट मुले प्रथम क्रमांक सोहम दांडेकर,१४ वर्ष वयोगट मुली प्रथम क्रमांक स्वरा जगताप, १७ वर्ष वयोगट मुले प्रथम क्रमांक क्षितिज भवरे, १९ वर्ष वयोगट मुले प्रथम क्रमांक वेदांत रिठे या चौघा विद्यार्थ्यांनी आपल्या चाणाक्ष बुद्धीने अतिशय उत्कृष्ट खेळ सादर करत प्रतिस्पर्धी संघांवर लिलया मात केली. त्यांच्या या पराक्रमी खेळामुळे त्यांना तालुक्यात प्रथम क्रमांक मिळाला आणि जिल्हा स्तरावर स्पर्धा करण्याची सुवर्णसंधी मिळाली. तर १२ सप्टेंबर रोजी आयोजित तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत १७ वर्षीय वयोगट मुले मधून कैफ दोसानी, कन्हैया मुसळे आणि श्रीपाद जाधव या विद्यार्थ्यांनी अतिशय दमदार खेळ सादर करून आपली वेगळी छाप उमटवली. या तिन्ही खेळाडूंनी दमदार विजय मिळवून माहूर तालुक्याचा क्रिडा क्षेत्रातील मान उंचावला आहे. या विजयी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन क्रीडा शिक्षक मुनेश्वर यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष भाग्यवान भवरे, मुख्याध्यापक संतोष कुमार, उपमुख्याध्यापक आयफाज शेख यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेत ज्ञानबाजी केशवे विद्यालय माहूर, जगदंबा विद्यालय माहूर, शंकरराव चव्हाण विद्यालय आष्टा, सह्याद्री पब्लिक स्कूल माहूर, पंचशील विद्यालय लखमापूर आदी शाळांमधील विद्यार्थ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता.

### मोफत सर्व रोग निदान व उपचार शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**हदगाव**-हदगाव येथे आज दि.१४ सप्टेंबर रोजी मोफत सर्व रोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन आ. कोहळीकर यांच्या नेतृत्वात तर दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था संचालित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे) यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित केले होते त्यात हजारो रुग्णांनी विविध आजारांसाठी तपासणी करून घेतल्याची माहिती कळविण्यात आली. यावेळी जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, संभाराव लांडगे, बाळासाहेब कदम, महंत गोपाळगीर महाराज , बाबुरावस कदम, अनिल पाटील बाभळीकर, विकास देवसरकर , सुदर्शन जाधव, शिवराज कदम, जयदीप जाधव, रामप्रसाद मुंदडा, बबन कदम, आबा वानखेडे, भास्कर वानखेडे, बबन माळोदे, अतुल राऊतराव, विनोद कदम यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था संचलित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी यांच्या विद्यमानाने व आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार कोहळीकर म्हणाले की, २० टक्के राजकारण, ८० टक्के समाजकारण या शिवसेनेच्या बीद्र वाक्यानुसार आपली वाटचाल चालू असून मतदारसंघातील नागरिकांच्या आरोग्य प्रश्न संबंधी कोणतीही अडचण सोडविण्यास आपण कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन यावेळेस केले. आरोग्य सेवा हीच खरी लोकसेवा या ध्येयाने प्रेरित होऊन हा उपक्रम मतदारसंघातील जनतेसाठी उपयुक्त ठरणार असल्याचे देखील म्हणाले. यापूर्वीसुद्धा या मतदारसंघात अशा प्रकाराचे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.आजच्या शिबिराचे हजारो नागरिकांनी लाभ घेतल्याची माहिती देखील कळविण्यात आली. यावेळी नेत्ररोग तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ, श्वसन रोग तज्ज्ञ, मेडिसिन तज्ज्ञ, सर्जरी तज्ज्ञ, कान नाक घसा तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ, त्वचारोग तज्ज्ञ, मुख रोग तज्ज्ञ यांनी या शिबिरास आलेल्या नागरिकांची तपासणी व पुढील उपचारासाठी योग्य ते मार्गदर्शन केले.

# बितनाळसह उमरी तालुक्यातील पांदन रस्ते घेणार मोकळा श्वास



**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. १४ सप्टेबर-**

तालूक्यातील मौजे बितनाळ सह तालुक्यातील ६२ ग्रामपंचायती हद्दीतील शिव पांदन रस्ते आता मजबुतीकरण होणार असल्याने गाव पातळीवर पांदन रस्ते पहाणी चालू झाली असल्याने आता पांदन रस्त्याना मोकळा श्वास मिळणार असल्याची माहिती ग्राम महसुल अधिकारी सय्यद मूर्तुजा यांनी दिली आहे .

राज्य सरकारने शेतकरी यांच्या हितासाठी गाव शिव पांदन रस्त्याचे मजबुतीरून मोकळे करण्यासाठी गाव पातळीवर ग्राम महसुल अधिकारी , सरंपच , पोलिस पाटील व शेतकरी शिव पांदन रस्त्याची पहाणी करीत आहेत तसे आदेश शासन धोरणानुसार तालुक्यात कामे चालू आहेत

प्रथमता उमरी तालुक्यातील बितनाळ येथिल ग्रामविकास महसुल अधिकारी सय्यद मूर्तुजा पटेल यांनी उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे व तहसीलदार मंजुषा भगत यांच्या मार्गदर्शनाखाली शिव पांदन रस्ते फेरीला सुरुवात केली आहे त्यांनी बितनाळ येथिल सर्व शेतकरी यांचे अडीअडचणी समस्या जाणून घेवून सविस्तर असे यांना मार्गदर्शन केले आहे व शासनाच्या शिव पांदन रस्त्याचे महत्व पटवून सांगीतले आहे .

बितनाळ ते रामखडक पांदन रस्ता , बितनाळ ते मंडाळा पांदन रस्ता , बितनाळ ते गणिपूर पांदन रस्ता , बितनाळ ते शिरूर पांदन रस्त्याची पहाणी व सर्वे करून शासन दारी प्रस्ताव पाठविला आहे या शासनाच्या धोरणाला शेतकरी दाद दिली असून अनेक वर्षापासून पांदन रस्ते चिखलमय होती आता मजबुतीकरण होणार असल्याने शेककरी राजा खुश झाला आहे . यावेळी तलाठी सय्यद मूर्तुजा पटेल ,गावातील प्रमुख सरपंच प्र मारोती उमाटे , पोलिस पाटील बाळासाहेब पल्लेलवाड , माजी सरपंच प्र मारोती वाघमारे , उपसरपंच प्र देविदास अक्कमवाड , गोविंद पहेलवान ( ग्रा प सदस् प्र ) ग्राम रोजगार सेवक राजू डुबूकवाड , प्रमोद अटपलवाड , सायन्ना आकमवाड ' सुभेदार डोगंरे , पत्रकार साहेबराव तुरेराव आदी शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# बिगबास्केटने नांदेड येथे सुरू केली १०-मिनिटांची डिलिव्हरी सेवा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ सप्टेबर-**

टाटा एंटरप्राईज, बिगबास्केट यांनी नांदेड येथे आपल्या क्विक डिलिव्हरी सेवेची सुरुवात केली आहे, ज्यामुळे शहरातील खरेदी अनुभवात एक मोठा बदल घडणार आहे. बिगबास्केट नांदेडकरांना १०,००० हून अधिक उत्पादनांची विस्तृत श्रेणी उपलब्ध करून देत आहे ज्यात ताजे फळे-भाज्या, इलेक्ट्रॉनिक्स आणि वैयक्तिक काळजीसंबंधी उत्पादने यांचा समावेश आहे आणि ही सर्व उत्पादने केवळ १० मिनिटांत ग्राहकांपर्यंत पोहोचवली जातील. ही सेवा खरेदीची सोय नव्याने परिभाषित करत आहे, ज्यामुळे ग्राहकांना घरबसल्या झटपट खरेदी करण्याचा अनुभव मिळेल.

नांदेड वेगाने विकसित होणारे शहरी केंद्र बनत असताना येथील रहिवासी अधिक स्मार्ट व कार्यक्षम खरेदी उपाय शोधत आहेत. शहरात गती, सोय व विश्वासार्हतेची वाढती मागणी बिगबास्केटच्या १०-मिनिट डिलिव्हरी सेवेच्या लाँचसाठी हे ठिकाण आदर्श बनवते. बदलत्या जीवनशैलीत आणि डिजिटल वापरात वाढ होत असताना ही वेळेवर केलेली सुरुवात नांदेडमधील ग्राहकांच्या सवयी आणि वाढत्या अपेक्षांशी सुसंगत आहे.

# नायगांव न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालतमध्ये पक्षकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १४ सप्टेबर-**

नायगांव येथील न्यायालयात दि.१३ सप्टेंबर २०२५ रोजी संपन्न झालेली राष्ट्रीय लोक अदालत ही एक यशस्वी आणि प्रेरणादायी मोहीम ठरली आहे. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई,व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,नांदेडच्या मार्गदर्शनाखाली, तसेच तालुका विधी सेवा समिती नायगांव बा. यांच्या संयुक्त विद्यमाने या लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते.

या विशेष लोक अदालतीमध्ये एकूण ३० प्रलंबित दिवाणी प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली, तर दाखल पूर्व २०२८ प्रकरणांमध्ये नोटिसा पाठवून संबंधित पक्षकारांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. यामध्ये ७० प्रकरणांचा यशस्वी निकाल लागला असून, बँका, पंचायत समिती व अन्य कार्यालयांची एकूण ६२,०३,१७८/- रूपयांची वसुली करण्यात आली आहे.या वसुलीमुळे संबंधित संस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.या शिवाय,

गुन्हा कबुलीच्या एकूण ५५ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला असून,त्यातून शासनाच्या तिजोरीत १४,२००/- रूपयांची रक्कम जमा करण्यात आली.

या यशस्वी उपक्रमामागे ए. टी. गित्ते (अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती तथा दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नायगाव बा.) यांचे मोलाचे नेतृत्व राहिले. संततधार पावसातही पक्षकारांचा उत्स्फूर्त सहभाग आणि न्यायालयीन यंत्रणेचे प्रभावी नियोजन हे या यशाचे खरे शिल्पकार ठरले.

कार्यक्रमामध्ये ड.कु. एस. बी. हाडोळीकर यांनी पॅनल विधीज्ञ म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तर तालुका विधीज्ञ संघाचे अध्यक्ष एल.एस. तुमेदवार संघाचे इतर सदस्य,न्यायालयीन कर्मचारी,व पोलीस कर्मचारी, तसेच बँक, पंचायत समिती व विविध संस्थांनी यावेळी समर्पित सेवा दिली.

# पशुधन पर्यवेक्षक डॉ. लोखंडे यांना पदोन्नतीपर निरोप

**तामसा**-पाथरड येथील पशु वैद्यकीय दवाखान्याचे पशुधन पर्यवेक्षक डॉ. पंकज लोखंडे यांची उमरी (स्टे.) तालुक्यातील गोळेगाव पशुवैद्यकीय दवाखान्यात सहाय्यक पशुधन विकास अधिकारी म्हणून पदोन्नती झाली असून त्यांना तामसा येथे पदोन्नतीपर निरोप देण्यात आला.

यावेळी पशुधन विकास अधिकारी डॉ. गुलाम शेख होते. पशुधन पर्यवेक्षक डॉ. पिराजी महागाडे, डॉ मारोती बोडखे, डॉ. मिलिंद नारळे, डॉ. अनिल सोनसळे, डॉ. विलास पवार, डॉ. सदाशिव सरकुंडे, डॉ. परमेश्वर गायकवाड, डॉ. ओंकार पवार, डॉ. विशाल गारोळे, डॉ. किरण दुगळे, डॉ. जगतीश हातमोडे, डॉ. दादाराव माने, डॉ शंकर कवाणे, महेश मठपती, बाबासाहेब बिडकर, पंडितराव पवार, योगेश अमृते, पत्रकार अरविंद हुंडेकर, पत्रकार अर्जुन जोशी आदी उपस्थित होते.

# मुक्रमाबाद येथील राष्ट्रीय राज्यमार्गावर विविध मागणीसाठी रास्ता रोको आंदोलन

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. १४ सप्टेबर-**

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील राष्ट्रीय राज्यमार्गावर विविध मागणीसाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे.

लेंडी प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी १० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने मुक्रमाबाद येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले.

लेंडी प्रकल्पातील २१ वर्षावरील युवकांना वाढीव कुटुंबाचा लाभ द्यावा,धरणग्रस्त प्रमाणपत्रासाठी स्वतंत्र टेबल मुक्रमाबाद येथे सुरु करावे,मूळ कुटुंबाच्या मावेजा वाटपातील शिल्लक नोटिसा द्याव्यात,वाढीव कुटुंबांच्या नोटिसा वाटप कराव्यात.

या आंदोलनात विविध संघटनांनी एकत्र येऊन जनआंदोलन उभारले आहे. लेंडी धरणग्रस्तांच्या मागण्या या परिसरातील जिव्हाळ्याच्या आहेत. या प्रश्नांचा तोडगा शासन ठोस निर्णय घेत नाही. आम्ही लेंडी प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होऊ देणार नाही. जर आंदोलकांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न झाला, तर त्याचे गंभीर परिणाम होतील. असा इशारा देण्यात आला. या रास्ता रोको आंदोलनाला परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, विविध चळवळीतील पदाधिकारी तसेच अनेक संघटनांनी पाठिंबा दिला. यामध्ये आरपीआयचे नेते माणिक दादा गायकवाड, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते शिवशंकर पाटील, शफी खुरेशी, पुणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष सागर भाऊ वानकर, मुखेड तालुका अध्यक्ष राज लष्करे,कलंबरकर ,ता:उपाध्यक्ष जगदीश कांबळे, सिद्धार्थ गायकवाड, सुनील कांबळे, विकास बोयवार, धनाजी बोयवार, बुद्धभूषण कांबळे, अविनाश गायकवाड यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# राष्ट्रवादी, वंचितच्या कार्यकर्त्यांचा काँग्रेस मध्ये प्रवेश



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १४ सप्टेबर-**

राष्ट्रवादी युवक काँग्रेस अजित पवार गटाचे शहाराध्यक्ष मुकेश कांबळे वंचित बहुजन आघाडीचे पिंटू चौदंते यांच्यासह असंख्य कार्यकत्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला असून आगामी निवडणूकीत काँग्रेस पक्षाच्या झेंडा फडकिवण्याचा निर्धार कार्यकत्यांनी केला आहे.

काँग्रेस पार्टी कार्यालयात दि.१४ सप्टेंबर रोजी पक्ष प्रवेश सोहळ्याचे तसेच मेळावा पूर्वतयारीसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते काँग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष प्रताप देशमूख बारडकर अध्यक्षस्थानी होते काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष कैलास गोडसे, माजी उपाध्यक्ष लक्ष्मण देवदे, माजी उपाध्यक्ष करीम खान , जिल्हा उपाध्यक्ष राजु चौदंते, सहसचिव गिरीष कोत्तावार , जिल्हा उपाध्यक्ष हाजी इलियास अब्बासी अनुसूचित जाती मागासवर्गीय सेलचे शहराध्यक्ष ऋषीकेश चौदंते,काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ता तेजाब पाटील मुंगल , युवक काँग्रेसचे तालूका अध्यक्ष प्रशांत पाटील मुंगल , शहराध्यक्ष मुजीब पठाण , काँग्रेस शहर उपाध्यक्ष सूर्यकांत चौदंते, शहर सचिव अतीख अहेमद, गजानन संबोड, संचालक महमद शरीफ , शहर उपाध्यक्ष महमद खदीर,भगवान पवार,अविनाश चौदंते, संजय बोकेफोड,बाळू क्षिरसागर, यशवंत रणखांबे, मोइन फूलवाले, बालाजी शिंदे, युवक सरचिटणीस आकाश सोनटक्के , बंडू पाटील , रमेश बोडके, माधव चमकूरे ,युवक उपाध्यक्ष वेदांत शेवटे, भिमराव महादवाड , कूलदिप मल्लेवार, मारोती गाढे, साई बोथंले, माधव बोकेफोड , काशिराम बोकेफोड , लतीफ टेलर्स यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

काँग्रेस पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी आगामी निवडणुकांची रणसिंग फुंकले लोकसभेतील काँग्रेस पक्षाचे नेते तथा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मलिकार्जुन खरगे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाला बळकट करण्यासाठी पुढाकार घेतला आहे

राज्याचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, नांदेड जिल्ह्याचे खासदार रवींद्र चव्हाण यांच्या सूचनेवरून तालुक्यातील प्रत्येक गावात काँग्रेस पक्षाचे ध्येय धोरणे सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्वधर्म समभाव रुजून यासाठी अभियान राबविण्याचा निर्धार केला आहे.

# बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करा ; ॲड. प्रदीप राठोड यांचे आमरण उपोषण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १४ सप्टेबर-**

राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटच्या आधारे मराठा समाजाला ओबीसी मध्ये समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे त्याच धर्तीवर मराठवाड्यातील बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकल बंजारा समाजाच्या वतीने ड. प्रदीप राठोड व पप्पू चव्हाण यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.




आंध्रप्रदेश व तेलगणा येथे बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती ( डढ ) वर्गात समावेश आहे. १९५६ पर्यंत मराठवाडा हा निजामशाहीतील हैदराबाद राज्याचा भाग होता. भाषावार प्रांतरचना होऊन महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर मराठवाड्यातील बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती (डढ) दर्जा नाकारून विमुक्त जाती-भटक्या प्रवर्गात टाकण्यात आले बंजारा समाजाला वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळ्या प्रवर्गात समावेश करण्यात आला आहे. मराठवाड्यातील बंजारा समाज शिक्षण नोकरी व प्रतिनिधित्वात मोठ्या प्रमाणावर मागे राहिला आहे. त्यामुळे मराठवाड्यातील बंजारा समाजाला हैदराबाद गॅजेटच्या धर्तीवर अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये समावेश करावा, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे अनुसूचित जाती यादीमध्ये समावेश करण्याची शिफारस करावी याचप्रमाणे अनुसूचित जाती प्रवर्गासह बंजारा समाजाच्या सोयी सुविधांसाठी दहा हजार कोटीची तरतूद करावी या मागण्यासाठी सकल बंजारा समाजाच्या वतीने ड. प्रदीप राठोड व पप्पू चव्हाण यांनी मागील तीन दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

या आंदोलनास ड. एस.डी राठोड, रवी राठोड, सुरेश राठोड, एस.आर. चव्हाण, त्रिशूल जाधव, ड. एस. आर. चव्हाण, पी.एम चव्हाण, नकुल चव्हाण यांच्यासह सकल समाजाचा मोठा पाठिंबा मिळत आहे